दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

## सुविचार

आज केलेली चांगली कृती उद्याचा आधार बनते. स्वतःवर विश्वास ठेवा, कारण विश्वासाशिवाय कोणतेही स्वप्न पूर्ण होत नाही.

## निवडणुकीत डिजिटल वॉर

**मुंबई:** मुंबई महानगरपालिका निवडणुकीत यंदा पारंपारिक रॅलींपेक्षा डिजिटल प्रचार आघाडीवर असल्याचे चित्र आहे. सोशल मीडिया, यूट्यूब, व्हॉट्सअ‍ॅप यांसारखी प्लॅटफॉर्म्स हेच प्रमुख रणांगण बनले आहेत. भाजप एआय-निर्मित व्हिडिओ व आकर्षक फॉरमॅट्सद्वारे तरुण मतदारांना लक्ष्य करत आहे, तर शिवसेना (उबाठा) पायाभूत सुविधा आणि स्थानिक विकासकामांवर भर देत आहे.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. ११ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १०९ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### आलिशान कारच्या शोरूमवर गोळीबार

**लुधियाना :** फिरोजपूर रोडवरील बडोवाल कॅन्टोन्मेंटजवळील एका लक्झरी कार शोरूमवर दोन अज्ञात दुचाकीस्वारांनी गोळीबार केल्याने पार्क केलेल्या दोन कारचे नुकसान झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली. वरिष्ठ पोलिस अधीक्षक अंकुर गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी दरोड्यांनी सहा गोळ्या झाडल्या, ज्यामुळे दोन आलिशान वाहनांच्या काचा फुटल्या. मात्र, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. गुप्ता म्हणाले की, घटनेनंतर दुचाकीवरून स्वार हल्लेखोर पळून गेले आणि गोळीबारामागील हेतू अद्याप समजू शकलेला नाही.

### युवा काँग्रेस कार्यकर्त्यांची पोलिसांशी झटापट

**भुवनेश्वर :** ओडिशाचे वाणिज्य व परिवहन मंत्री बिभूती भूषण जेना यांच्या अधिकृत निवासस्थानाबाहेर शनिवारी युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलिसांशी निदर्शने केली. ओडिशा युवा कॉंग्रेसचे अध्यक्ष रणजीत पात्रा यांच्या नेतृत्वात पक्षाचे शेकडो कार्यकर्ते मंत्र्यांच्या निवासस्थानाकडे सायकल रॅलीवर गेले आणि पोलिसांनी त्यांना रोखले, त्यानंतर आंदोलक आणि सुरक्षा कर्मचारी यांच्यात हाणामारी झाली. काही कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले, अशी माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

### तांदूळ निर्यातदारांना बाजार शुल्कात सूट

**रायपूर :** छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई यांनी जाहीर केले की, तांदूळ निर्यातदारांना मंडी (बाजार) शुल्कावरील सूट आणखी एका वर्षासाठी वाढविण्यात येईल. येथील एका खासगी रिसॉर्टमध्ये इंडिया इंटरनॅशनल राईस समिटच्या दुसऱ्या आवृत्तीला संबोधित करताना साई म्हणाले की, हा विस्तार निर्यातदार आणि शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण ठरेल आणि जागतिक तांदूळ बाजारात छत्तीसगडचे स्थान मजबूत करेल.

## गृह विभागाच्या अहवालामुळे राज्यात खळबळ

# फडणवीस–शिंदेंना अडकवण्याचा कट?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



### पालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रकरण उघड

● भाजपचे मंत्री नितेश राणे यांनी या कथित कटामध्ये सहभागी असलेल्या सर्व व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अशा प्रकारे राज्याच्या राजकारणात पोलीस यंत्रणेच्या भूमिकेवरच प्रश्न उपस्थित करणारा हा अहवाल सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरला आहे. महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उघड झालेल्या या प्रकरणामुळे पुढील काळात राजकीय संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.

**मुंबई :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असतानाच राज्याच्या गृह विभागातून आलेल्या एका विशेष चौकशी अहवालामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या अहवालात माजी पोलीस महासंचालक संजय पांडे यांच्यावर २०२१ साली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अर्बन लँड सीलिंग अर्थात यूएलसी घोटाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

हा अहवाल नुकत्याच निवृत्त झालेल्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी त्यांच्या निवृत्तीच्या अवघ्या चार दिवस आधी सादर केला होता. विशेष चौकशी अहवालानुसार, संजय पांडे यांनी ठाण्याचे तत्कालीन डीसीपी लक्ष्मीकांत पाटील आणि एसीपी सरदार पाटील यांना २०१६ मधील यूएलसी घोटाळ्याच्या प्रकरणात देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना अटक करण्याचे निर्देश दिले होते. या कथित कारवाईमागे फडणवीस आणि शिंदे यांनी बिल्डरांकडून पैसे उकळल्याचा बनाव उभा करण्याचा हेतू असल्याचा आरोप अहवालात करण्यात आला आहे. त्यासाठी संबंधित वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांवर सातत्याने दबाव टाकण्यात आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेले संजय पुनामिया यांनी सादर केलेल्या एका ऑडिओ क्लिपचाही अहवालात उल्लेख आहे. या ऑडिओमध्ये एसीपी सरदार पाटील, डीजीपी संजय पांडे आणि डीसीपी लक्ष्मीकांत पाटील यांच्यातील कथित संभाषण आहे. या संभाषणात देवेंद्र फडणवीस यांना या प्रकरणात कसे गोवायचे, याबाबत चर्चा झाल्याचा दावा अहवालात करण्यात आला आहे. अहवालात पुढे असे नमूद करण्यात आले आहे की, संजय पुनामिया आणि सुनील जैन यांना कोपरी पोलीस ठाण्यात अटक करण्यात आल्यानंतर ठाण्याचे तत्कालीन डीसीपी (गुन्हे) लक्ष्मीकांत पाटील यांनी त्यांची यूएलसी घोटाळ्याबाबत चौकशी केली. प्रत्यक्षात ते या चौकशीशी थेट संबंधित नव्हते, तरीही त्यांनी हस्तक्षेप केल्याचा आरोप करण्यात आला आहे. हा अहवाल सार्वजनिक होताच राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी या अहवालावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. रश्मी शुक्ला या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित असल्याचा दावा करत, त्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य संघाचे कार्यकर्ते असल्याचे त्यांनी सांगितले.

## कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पात मोबाईलवर बंदी

### प्रवेश करताना मोबाईल जमा करणे बंधनकारक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**देहराडून :** उत्तराखंडमधील जागतिक कीर्तीच्या कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पात वन्यजीव पर्यटनाच्या नियमांमध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. उद्यानाच्या कोअर झोनमध्ये प्रवेश करणाऱ्या सर्व पर्यटकांसाठी मोबाईल फोन वापरावर पूर्ण बंदी घालण्यात आली असून, सफारीपूर्वी मोबाईल प्रवेशद्वारावर जमा करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मानवी हस्तक्षेप कमी करणे आणि वन्यजीवांची सुरक्षितता सुनिश्चित करणे हा या निर्णयामागचा मुख्य उद्देश असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील आदेशांच्या पार्श्वभूमीवर हे निर्देश लागू करण्यात आले असून, दिवसाची सफारी असो वा रात्रीचा मुक्काम, सर्व पर्यटकांना हे नियम पाळावे लागणार आहेत. कॉर्बेट व्याघ्र प्रकल्पाचे संचालक डॉ. साकेत बडोला यांनी सांगितले की, न्यायालयाच्या निर्देशांचे काटेकोर पालन होण्यासाठी नव्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी केली जात आहे. त्यानुसार, जंगलात प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक पर्यटकाला आपला मोबाईल फोन प्रवेशद्वाराजवळ जमा करावा लागेल. वन्यजीव तज्ज्ञ आणि अनुभवी निसर्ग मार्गदर्शकांकडून मोबाईलच्या अमर्याद वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय धोक्यांविषयी सातत्याने चिंता व्यक्त केली जात होती. फोटो, सेल्फी किंवा व्हिडिओ काढण्याच्या नादात अनेक पर्यटक सुरक्षित अंतर तोडतात, त्यामुळे प्राण्यांमध्ये तणाव निर्माण होतो आणि कधी कधी आक्रमक वर्तनही वाढते, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले होते.

## बीड जिल्ह्यातील मतदारांसाठी संदीप क्षीरसागर पुणे महापालिकेच्या प्रचारात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**कोलकाता :** पिंपरी चिंचवड। पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक आता चांगलीच रंगात आली असून या ठिकाणी दोन्ही राष्ट्रवादी एकत्र निवडणूक लढत आहेत मराठवाड्यातील विशेषता बीड जिल्ह्यातील मतदारांना आपल्या पक्षाला युतीला मतदान करावे यासाठी बीडचे शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर बीडचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के दोघेही प्रचाराला लागले आहेत पुणे पिंपरी चिंचवड मध्ये राष्ट्रवादी शरद पवार गट आणि राष्ट्रवादी अजित पवार गट दोघेही काका पुतणे एकत्र आल्याने दोन्ही राष्ट्रवादींना आता प्रचार करावा लागत आहे अशातच आज पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रातील वाकड परिसरामध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांची प्रचार सभा होती याच सभेदरम्यान राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बीडचे आमदार संदीप क्षीरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी हजेरी लावली व जिल्ह्यातील मतदारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवाराला विजयी करावे असे आवाहन केले विशेषतः या महापालिका क्षेत्रात बीड जिल्ह्यातील असलेल्या मतदारांना ते आव्हान करण्यासाठी पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात प्रचार करत आहेत

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या कार्यक्रमातील उपस्थितीची चर्चा

# धनंजय मुंडेंना घेऊन मुख्यमंत्री उडाले

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बीड :** बीड जिल्ह्यात शनिवारी घडलेल्या एका राजकीय क्षणाकडे साऱ्यांचे लक्ष वेधले गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात माजी मंत्री धनंजय मुंडे यांची हजेरी आणि दोघांमध्ये झालेली भेट 'मुख्यमंत्री धनूभाऊंना घेऊन उडाले का?' अशा चर्चांना राजकीय वर्तुळात वाव देणारी ठरली. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत मोठा धार्मिक सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह माजी मंत्री धनंजय मुंडे यांनीही हजेरी लावली. विशेष म्हणजे, कार्यक्रमाच्या निमित्ताने मुख्यमंत्री फडणवीस आणि धनंजय मुंडे यांच्यात भेट झाल्याने बीड जिल्ह्याच्या राजकारणात चर्चांना उधाण आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये धनंजय मुंडे नाराज असल्याच्या चर्चा काही काळापासून सुरू आहेत. बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादीतीलच काही लोकप्रतिनिधी त्यांच्या विरोधात उघड भूमिका घेत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे परळी वगळता जिल्ह्यातील अनेक पक्षीय कार्यक्रमांपासून मुंडे अलिप्त राहिल्याचे चित्र गेल्या काही दिवसांत दिसत होते. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बीड जिल्ह्यात झालेल्या सहा सभांना धनंजय मुंडे गैरहजर राहिले होते. १ जानेवारी रोजी झालेल्या अजित पवारांच्या सभेला त्यांनी कौटुंबिक कारण देत अनुपस्थिती दर्शवली होती. मात्र त्यानंतरच्या दिवशीच ते जिल्ह्यातील अन्य कार्यक्रमांत सहभागी झाल्याने त्यांच्या गैरहजेरीबाबत राजकीय वर्तुळात शंका व्यक्त करण्यात येत होत्या. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बीड दौऱ्यावर असताना धनंजय मुंडे त्यांच्या स्वागतासाठी उपस्थित राहिल्याने अनेक राजकीय तर्कवितर्क सुरू झाले आहेत. राष्ट्रवादीत अस्वस्थता असून मुंडे वेगळी राजकीय भूमिका घेण्याच्या तयारीत आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दिवंगत संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हा मुख्य आरोपी म्हणून अद्याप कारागृहात आहे. या प्रकरणानंतर धनंजय मुंडे यांना मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर काही काळ त्यांनी सार्वजनिक कार्यक्रमांपासून अंतर ठेवले होते. अजित पवारांचे बीड दौरे सुरू असतानाही मुंडेंची अनुपस्थिती प्रकर्षाने जाणवत होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतल्याचे वृत्त समोर आले होते. त्यातच आता मुख्यमंत्री फडणवीस यांच्याशी झालेल्या भेटीमुळे बीडच्या राजकारणात नव्या घडामोडींची शक्यता वर्तवली जात आहे. येत्या काळात धनंजय मुंडे कोणती राजकीय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## अल्पवयीन प्रेमिंना शिक्षेतून मिळणार दिलासा

### पोक्सो कायद्यात नव्या तरतूदी, गैरवापर रोखण्यासाठी प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचारांच्या विरोधात असलेल्या 'पोक्सो' कायद्याचा वाढता गैरवापर रोखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने आता पुढाकार घेतला आहे. किशोरावस्थेतील मुला-मुलींमध्ये परस्पर संमतीने निर्माण झालेल्या प्रेमसंबंधांना या कठोर कायद्याच्या कचाट्यातून वाचवण्यासाठी कायद्यात विशेष 'रोमिओ-ज्यूलिएट' तरतूद समाविष्ट करण्याचे निर्देश न्यायालयाने केंद्र सरकारला दिले आहेत. केवळ संमतीने संबंध ठेवले म्हणून तरुणांचे भविष्य उद्ध्वस्त होऊ नये, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. न्यायमूर्ती संजय करोल आणि न्यायमूर्ती एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने स्पष्ट केले की, पोक्सो कायदा हा मुलांच्या संरक्षणासाठी बनवलेला एक अत्यंत पवित्र कायदा आहे. मात्र, अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे की, जेव्हा दोन किशोरवयीन मुले एकमेकांच्या प्रेमात असतात आणि त्यांच्या वयात फारसे अंतर नसते, तेव्हा कुटुंबाकडून विरोधापोटी मुलावर या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला जातो. अशा प्रकारे सूड उगवण्यासाठी कायद्याचा वापर होणे ही चिंतेची बाब असून यामुळे अनेक होतकरू तरुणांचे आयुष्य जेलमध्ये वाया जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. या संदर्भात भाष्य करताना न्यायालयाने केंद्र सरकारला असे सूचित केले की, ज्या प्रकरणांमध्ये दोन्ही बाजू अल्पवयीन आहेत आणि त्यांचे संबंध परस्पर संमतीवर आधारित आहेत, तिथे कायद्याची कठोरता थोडी शिथिल व्हायला हवी. तसेच, जे लोक वैयक्तिक वैमनस्यातून किंवा बदल्याच्या भावनेतून या कायद्याचा गैरवापर करतात, त्यांच्यावरही कठोर कारवाई करण्याची तरतूद असायला हवी. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा एक जुना आदेश रद्द करताना सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की, वयाचा निकष हा खटल्याच्या सुनावणीचा भाग आहे, तो केवळ जामिनासाठी अनिवार्य करू नये. शेवटी न्यायालयाने वकिलांनाही एक महत्त्वाचे आवाहन केले. खोट्या तक्रारींच्या माध्यमातून कोणाचे तरी आयुष्य उद्ध्वस्त होत असेल, तर वकिलांनी तिथे योग्य भूमिका बजावली पाहिजे.

## अयोध्येतील राममंदिर परिसरात नमाजाचा प्रयत्न; तिघांना ताब्यात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या :** रामजन्मभूमी मंदिर परिसरात शनिवारी सकाळी खळबळ उडवणारी घटना घडली. मंदिर संकुलात प्रवेश करून नमाज पठण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोन पुरुषांना आणि एका तरुणीला सुरक्षा रक्षकांनी रंगेहाथ पकडले. या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्यांनी स्वतःची ओळख काश्मीरचे रहिवासी म्हणून दिली आहे. प्राथमिक माहितीनुसार, हे तिन्ही जण राम मंदिराच्या डी-१ प्रवेशद्वारातून आत गेले होते. त्यानंतर मुख्य मंदिरापासून सुमारे २०० मीटर अंतरावर असलेल्या 'सीता रसोई' परिसरात एकाने नमाज पठण करण्यास सुरुवात केली. त्यांचा संशयास्पद वावर लक्षात येताच तेथे तैनात असलेल्या विशेष सुरक्षा दलाच्या जवानांनी तत्काळ हस्तक्षेप करून तिघांनाही रोखले. पकडण्यात आलेल्यांपैकी एकाचे नाव अबू अहमद शेख असून तो काश्मीरमधील शोपियान जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे सांगितले जाते. तरुणीचे नाव सोफिया असल्याची माहिती मिळाली आहे. तिसऱ्या व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. या घटनेनंतर मंदिर परिसरातील सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रवेशावेळी कडक तपासणी असली तरी ओळखपत्रांची सक्ती नसल्याचा फायदा या तिघांनी घेतल्याची चर्चा आहे. ताब्यात घेतल्यानंतर त्यांनी घोषणाबाजी केल्याचेही काही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. प्रकरणाची गंभीर दखल घेत गुप्तचर यंत्रणा आणि

## मुख्यमंत्री फडणवीसांवर आचारसंहिता उल्लंघनाचा आरोप

### निवडणूक आयोगाकडून तक्रारीची दखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करत काँग्रेसने दाखल केलेल्या तक्रारीची महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाने दखल घेतल्याचा दावा काँग्रेसने केला आहे. काँग्रेसकडून शनिवारी याबाबत प्रसिद्धीपत्रक जारी करण्यात आले. राज्य निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी तक्रार प्राप्त झाल्याची पुष्टी केली असली, तरी त्यावर नेमकी कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबत स्पष्ट माहिती देण्यात आलेली नाही. काँग्रेसने स्पष्ट केले की, २ जानेवारी रोजी मुख्यमंत्री फडणवीस मुंबई मेट्रोमधून प्रवास करत असताना एका खाजगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीसंदर्भात ही तक्रार दाखल करण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतूक सुविधेचा वापर करून माध्यमांशी संवाद साधणे हे आदर्श आचारसंहितेच्या विरोधात असून, यामध्ये सरकारी यंत्रणांचा अप्रत्यक्ष गैरवापर झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस धनंजय शिंदे यांनी सांगितले की, या प्रकरणी ९ जानेवारी रोजी राज्य निवडणूक आयुक्तांना अंतिम स्मरणपत्र देण्यात आले होते.

## "सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण" घोषणेसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र निदर्शने

# मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे भयावह वास्तव; बीड जिल्हा अव्वल

■ दैनिक राज्य लोकतंत्र



● २०२४ मध्ये ● ९८४ शेतकरी आत्महत्या

● २०२५ मध्ये ● ११२९ शेतकरी आत्महत्या

### तर परिस्थिती आणखी गंभीर....

● आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये मराठवाड्यात ९८४ शेतकरी आत्महत्या झाल्या होत्या, तर २०२५ मध्ये हा आकडा वाढून ११२९ वर पोहोचला आहे. यावर्षी मराठवाड्यावर आसमानी संकट कोसळल्याने ४० लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावरील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश परिस्थिती, उत्पादन खर्चात वाढ, कर्जबाजारीपणा आणि अपुरी शासकीय मदत यामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला असून, त्यातूनच आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. शेतकऱ्यांचे प्रश्न गांभीर्याने न घेतल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असा इशारा देत सरकारने तातडीने कर्जमाफी, पीक विम्याची थकबाकी, नुकसानभरपाई व हमीभावाबाबत ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.

**बीड :** मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र थांबण्याचे नाव घेत नसून, २०२५ या चालू वर्षात आतापर्यंत ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. यामध्ये एकट्या बीड जिल्ह्यात २५६ शेतकऱ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले असून, सलग दुसऱ्या वर्षी बीड जिल्हा मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांमध्ये आघाडीवर आहे. या विदारक परिस्थितीमुळे सर्वत्र तीव्र चिंता व्यक्त होत आहे.

शासन व प्रशासनाच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळेच आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप करत "सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरण" या घोषणेच्या निषेधार्थ शुक्रवारी (दि. ०९) बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. ही निदर्शने सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य) डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांच्या नेतृत्वाखाली पार पडली.

यावेळी आंदोलकांनी सरकारच्या शेतकरी धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. केवळ घोषणा, पाहणी दौरे आणि फोटोसेशनपुरते मर्यादित न राहता शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी ठोस, परिणामकारक आणि तातडीच्या उपाययोजना राबवाव्यात, अशी ठाम मागणी करण्यात आली. यासंदर्भातील सविस्तर निवेदन जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले. आंदोलनात माजी सैनिक अशोक येडे (जिल्हाध्यक्ष, आम आदमी पार्टी), रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष, इंटक), कुलदीप करपे (जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना), शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, सुहास जायभाये, माहिती अधिकार कार्यकर्ते शेख मुबीन, पांडुरंग हराळे, गणेश नाईकवाडे (जिल्हाध्यक्ष, मराठा महासंघ), प्रा. डी. जी. तांदळे (अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य किसानसभा, जि. बीड), प्रा. राजकुमार यादव, डॉ. संजय तांदळे यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## अजितदादांच्या नेतृत्वात पुण्यासाठी सर्व प्लॅन तयार; सुप्रिया सुळेंचं मोठं विधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** राज्यात महापालिका निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गट आणि शरद पवार गटाने युती करत राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवली आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यात आज दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेला उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुप्रिया सुळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी महापालिका निवडणुकीसाठीचा जाहीरनामा जाहीर करण्यात आला.

या पत्रकार परिषदेनंतर माध्यमांशी बोलताना खासदार सुप्रिया सुळे यांनी पुण्याच्या विकासासंदर्भात महत्त्वपूर्ण विधान केले. "पुण्याच्या विकासासाठी आवश्यक असलेले सर्व नियोजन अजितदादांच्या नेतृत्वात तयार आहे," असे स्पष्ट करत त्यांनी अजित पवार यांच्या कार्यशैलीवर विश्वास व्यक्त केला.

सुप्रिया सुळे म्हणाल्या, "आम्ही पुण्याचे लोकप्रतिनिधी आहोत. मी स्वतः ज्या इमारतीत राहते तिथे आजही टँकरने पाणी येते. शहरात टँकर माफिया वाढत चालले आहेत. मेट्रोची लास्ट माईल कनेक्टिव्हिटी पूर्ण होणे अत्यंत गरजेचे आहे. अजितदादांनी ज्या मेट्रो प्रकल्पांचा उल्लेख केला, ते प्रकल्प आम्ही यशस्वीपणे पूर्ण करू शकतो. त्यासाठीचा सविस्तर आराखडा आमच्याकडे आधीपासूनच तयार आहे."

# अमेरिकेला भीती डी-डॉलरायझेनशची!

जगाच्या अर्थकारणावर वर्चस्व गाजवणाऱ्या अमेरिकी डॉलरचे चित्र आता बदलते आहे. तेल व्यापार, निर्बंधांचे राजकारण आणि नव्या आंतरराष्ट्रीय समीकरणांमुळे 'पेट्रोडॉलर' व्यवस्थेला पहिल्यांदाच गंभीर आव्हान उभे राहिले असून, त्यातून जागतिक आर्थिक सत्तासंतुलनाचा नवा अध्याय सुरू होत आहे.

जगाच्या अर्थकारणावर गेली पाच दशके अधिराज्य गाजवणाऱ्या अमेरिकी डॉलरच्या वर्चस्वाला सध्या पहिल्यांदाच ठोस आव्हान उभे राहिले आहे. हे आव्हान थेट युद्धातून किंवा आर्थिक मंदीतून आलेले नाही, तर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या रचनेत हळूहळू घडणाऱ्या बदलांतून पुढे येत आहे. विशेषतः तेल व्यापार आणि डॉलर यांच्यातील नाते सैल होण्याची शक्यता, म्हणजेच 'डी-डॉलरायझेशन', अमेरिकेसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. १९७० च्या दशकात पेट्रोलियम निर्यात करणाऱ्या देशांनी तेल विक्रीसाठी अमेरिकी डॉलर स्वीकारला. यालाच पुढे 'पेट्रोडॉलर' व्यवस्था म्हणण्यात आले. या व्यवस्थेमुळे जगातील बहुतांश देशांना तेल खरेदीसाठी डॉलर साठवणे अपरिहार्य झाले. परिणामी डॉलर हे केवळ एक चलन न राहता जागतिक आर्थिक व्यवस्थेचे केंद्र बनले. अमेरिका आपल्या तुटीच्या अर्थसंकल्पाला, मोठ्या कर्जाला आणि लष्करी खर्चाला याच डॉलरच्या जागतिक मागणीच्या बळावर सांभाळू शकली. मात्र, आज हेच चित्र बदलताना दिसत आहे. अमेरिका आर्थिक निर्बंधांचा वापर परराष्ट्र धोरणाचे हत्यार म्हणून करत असल्याने अनेक देश अस्वस्थ झाले आहेत. रशिया, चीन, इराणसारख्या देशांना डॉलर व्यवहारांपासून दूर ठेवण्याचे प्रयत्न झाले. यामुळे डॉलरवर अवलंबून राहणे म्हणजे आर्थिक आणि राजकीय जोखीम पत्करणे, अशी भावना अनेक देशांत वाढली. त्यातूनच स्थानिक चलनांमध्ये व्यापार, परस्पर चलन व्यवहार, आणि

**पश्चिम बंगालमधील एसआयआर मोहीम, बांगलादेशी घुसखोरीचा मुद्दा आणि आय-पॅकसारख्या संस्थांची भूमिका यांमुळे राजकारण आणि तपास यांच्यातील सीमारेषा धूसर होत आहे. हा संघर्ष पक्षांपुरता मर्यादित नसून, तो लोकशाहीच्या संस्थात्मक विश्वासाची कसोटी पाहणारा ठरतो.**




डॉलरशिवाय पर्यायी व्यवस्था उभारण्याचे प्रयत्न सुरू झाले. तेल व्यापार हा या बदलाचा केंद्रबिंदू आहे. तेल खरेदी-विक्री डॉलरऐवजी इतर चलनांत होऊ लागली, तर पेट्रोडॉलर व्यवस्थेलाच तडा जाईल. काही व्यवहार युआन, युरो किंवा स्थानिक चलनांत होऊ लागले आहेत, हे प्रमाण मर्यादित असले तरी त्याचे प्रतीकात्मक महत्त्व मोठे आहे. कारण तेल हा जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तिथेच डॉलरचे वर्चस्व कमी झाले, तर त्याचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. अमेरिकेची अस्वस्थता याच ठिकाणी दिसून येते. डॉलरच्या जागतिक भूमिकेमुळे अमेरिकेला जे 'विशेषाधिकार' मिळाले होते, ते हळूहळू कमी होतील, ही भीती खरी आहे. डॉलरची मागणी कमी झाली, तर अमेरिकेचे कर्ज उभारणे महाग होईल, महागाईचा धोका वाढेल आणि आर्थिक धोरणांवर मर्यादा येतील. म्हणूनच अमेरिका पेट्रोडॉलर व्यवस्था टिकवण्यासाठी राजनैतिक आणि आर्थिक पातळीवर प्रयत्न करताना दिसते. मात्र हे चित्र एकांगी नाही. डॉलर अजूनही सर्वात विश्वासार्ह चलन आहे, हे वास्तव नाकारता येत नाही. जागतिक वित्तीय बाजार, गुंतवणूक, कर्जव्यवहार, परकीय चलन साठे यांत डॉलरचे वर्चस्व अजूनही भक्कम आहे. डी-डॉलरायझेशन ही प्रक्रिया झपाट्याने होईल, असे नाही. ती संथ, विस्कळित आणि अनेक अडथळ्यांनी भरलेली असेल. अनेक देशांना अजूनही डॉलरच्या स्थैर्याची गरज आहे. तरीही, दिशा बदलते आहे, हे स्पष्ट आहे. जग आता एकाच चलनावर अवलंबून राहण्याऐवजी बहुपर्यायी आर्थिक व्यवस्थेकडे पाहत आहे. हा बदल केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे. डॉलरच्या वर्चस्वामागे असलेली अमेरिकेची सत्ता, नियम ठरवण्याची क्षमता आणि निर्बंध लादण्याची ताकद यांनाही हे आव्हान आहे. भारतासारख्या देशांसाठी ही परिस्थिती संधी आणि आव्हान दोन्ही घेऊन येते. एकीकडे डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याचे पर्याय खुले होतात, तर दुसरीकडे जागतिक अस्थिरतेत सावध भूमिका घ्यावी लागते. कोणत्याही एका गटाशी पूर्णपणे बांधील न राहता व्यवहारिक आणि संतुलित धोरण ठेवणे आवश्यक ठरेल. पेट्रोडॉलर व्यवस्थेवरील चर्चा ही एका चलनापुरती मर्यादित नाही. ती जागतिक सत्तासंतुलनातील बदलाची खूण आहे. जुनी व्यवस्था कोसळत नाही, पण तिच्या जागी नवी, अधिक गुंतागुंतीची आणि बहुध्रुवीय व्यवस्था आकार घेत आहे. अमेरिकेची भीती ही केवळ डॉलरची नाही, तर बदलत्या जगात आपले स्थान कसे टिकवायचे, या प्रश्नाची आहे. आणि हाच प्रश्न येत्या दशकांत जागतिक राजकारण आणि अर्थकारणाची दिशा ठरवणार आहे.

## संपादकीय

### बंगालमध्ये लोकशाहीचीच कसोटी

**बंगालमध्ये तेथील ममता बॅनर्जी यांचे सरकार आणि केंद्रीय एजन्सी यांच्यात जो संघर्ष होत आहे, त्याचा थेट फटका लोकशाही व्यवस्थेलाच बसणार आहे. बंगालमध्ये असे संघर्ष नवे नसले, तरी त्याची प्रत्यक्ष झळ लोकशाही व्यवस्थेला बसत नव्हती.**

पश्चिम बंगालमध्ये सध्या जे घडते आहे, ते एखाद्या राज्यापुरते मर्यादित नाही. केंद्र आणि राज्य यांच्यातील सत्तासंघर्ष कुठे जाऊन थांबायला हवा, याचा तो थेट प्रश्न आहे. आर्थिक गुन्ह्यांच्या तपासासाठी नेमलेल्या केंद्रीय यंत्रणा आणि राज्य सरकार यांच्यातील संघर्ष आता केवळ कायदेशीर चौकटीत राहिलेला नाही; तो राजकीय प्रतिष्ठेचा आणि सत्तेच्या वर्चस्वाचा बनत चालला आहे. "तुमची एजन्सी" आणि "माझे पोलीस" असा थेट संघर्ष लोकशाहीसाठी धोक्याचा आहे, हेच या घडामोडी अधोरेखित करतात. केंद्रीय तपास यंत्रणा पश्चिम बंगालमध्ये कारवाई करतात, तेव्हा त्याला तृणमूल काँग्रेसकडून राजकीय सूडबुद्धीचे लेबल लावले जाते. त्याचवेळी केंद्राकडून असा दावा केला जातो की, राज्य सरकार तपासात अडथळे आणत आहे. या आरोप-प्रत्यारोपांच्या खेळात मूळ प्रश्न बाजूला पडतो. तपास स्वतंत्रपणे आणि कायद्याच्या चौकटीत होतो आहे का, हा खरा मुद्दा आहे. तो दुर्लक्षित राहिला, तर सत्तासंघर्षाचा शेवट लोकशाही संस्थांच्या विश्वासार्हतेवरच घाव घालणारा ठरतो. पश्चिम बंगालमधील हे चित्र नवे नाही. याआधीही अनेक वेळा राज्य पोलीस आणि केंद्रीय यंत्रणांमध्ये थेट तणाव दिसून आला आहे. तपासासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना अडवणे, त्यांच्यावर हल्ले होणे, स्थानिक प्रशासनाने सहकार्य न करणे, या साऱ्या घटना गंभीर आहेत. त्याचवेळी, केंद्रातील सत्ताधाऱ्यांच्या काळात तपास यंत्रणांचा वापर राजकीय दबावासाठी होतो, असा आरोपही वारंवार होतो. यातून जनतेच्या मनात संभ्रम निर्माण होतो. तपास म्हणजे न्यायासाठी की सत्तेसाठी, असा प्रश्न निर्माण होतो. लोकशाही व्यवस्थेत तपास यंत्रणा कोणाच्याही दबावाखाली नसाव्यात, हे तत्त्व सर्वमान्य आहे. पण प्रत्यक्षात तसे होताना दिसत नाही. विरोधी पक्ष सत्तेत असलेल्या राज्यांत तपास यंत्रणांची सक्रियता वाढते आणि सत्ताधारी पक्षाच्या राज्यांत ती तुलनेने मंदावते, असा आरोप विरोधक करतात. हे चित्र खरे असो वा नसो, त्यातून तपास यंत्रणांवरचा विश्वास मात्र डळमळीत होतो. न्यायप्रक्रियेवर संशय निर्माण होतो, आणि हेच लोकशाहीसाठी घातक ठरते. दुसरीकडे, राज्य सरकारांनीही स्वतःला कायद्याच्या वर समजणे धोक्याचे आहे. केंद्राची एजन्सी आली म्हणजे ती शत्रू आहे, असा सूर घेणे योग्य नाही. तपासाला अडथळा आणणे, कायद्याच्या चौकटीबाहेर जाऊन राजकीय शक्तिप्रदर्शन करणे, हे राज्यसत्तेच्या मर्यादांवर प्रश्नचिन्ह उभे करते. तपासाला विरोध करायचा असेल, तर तो न्यायालयात, कायदेशीर मार्गाने करायला हवा. रस्त्यावर उतरून किंवा प्रशासकीय यंत्रणांचा गैरवापर करून नव्हे. या सगळ्या घडामोडींचा एक गंभीर परिणाम असा होतो की, केंद्र-राज्य संघर्ष हा सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर पडदा टाकतो. रोजगार, महागाई, पायाभूत सुविधा, सामाजिक सुरक्षा यांसारखे मुद्दे मागे पडतात. सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडण्यात गुंततात, आणि प्रशासनाचा केंद्रबिंदू भरकटतो. लोकशाहीतील सत्तेचा उद्देश सेवा असायला हवा, संघर्ष नव्हे. खरे तर संविधानाने केंद्र आणि राज्य यांच्यात स्पष्ट अधिकारवाटणी केली आहे. तपास यंत्रणांना दिलेले अधिकारही त्याच चौकटीत आहेत. त्या चौकटीचा सन्मान दोन्ही बाजूंनी झाला पाहिजे. केंद्राने तपास यंत्रणांचा वापर राजकीय सूडासाठी होऊ देऊ नये, आणि राज्यांनी तपासाला अडथळा आणण्याची भूमिका घेऊ नये. दोन्ही बाजूंनी संयम आवश्यक आहे. न्यायालयांची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची ठरते. अशा संघर्षांमध्ये अंतिम शब्द न्यायालयांनीच सांगितला पाहिजे. तपास कितपत योग्य आहे, अधिकारांचा गैरवापर झाला आहे का, याचा निर्णय न्यायालयीन प्रक्रियेतूनच व्हायला हवा. राजकीय भाषणांतून किंवा शक्तिप्रदर्शनातून नव्हे. न्यायालयांवरचा विश्वास टिकवणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. पश्चिम बंगालमधील संघर्ष हा केवळ एका राज्याचा प्रश्न नाही. तो संपूर्ण देशासाठी इशारा आहे. सत्ताधाऱ्यांनी आणि विरोधकांनीही हे लक्षात घ्यायला हवे की, या संघर्षाची झळ लोकशाही व्यवस्थेलाच बसेल. सत्ता येते-जाते, पण संस्था टिकल्या पाहिजेत. त्या टिकल्या, तरच लोकशाही टिकेल. तपास आणि राजकारण यांच्यातील ही सीमारेषा पुसट झाली, तर त्याचे परिणाम दूरगामी असतात. म्हणूनच, संघर्ष नव्हे तर संविधान, दबाव नव्हे तर कायदा, आणि शक्ती नव्हे तर प्रक्रिया, या तत्त्वांवरच लोकशाहीचा डोलारा उभा राहतो. याचे भान ठेवणे, हीच आजची सर्वात मोठी गरज आहे.

# ज्येष्ठ नागरिकांचा मतदानासाठी निर्धार

## मतदानाची शपथ घेऊन १५ जानेवारीला मतदान करण्याचा संकल्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांमध्ये मतदानाचे महत्त्व प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. याच स्वीप (SVEEP) अभियानाचा एक भाग म्हणून संत तुकाराम नगर येथील विरंगुळा केंद्रात ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात ज्येष्ठ नागरिकांनी अभूतपूर्व उत्साह दाखवत मतदानाची शपथ घेत येत्या १५ जानेवारी रोजी मतदान करण्याचा ठाम संकल्प व्यक्त केला.



महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमाला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त ममता शिंदे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, ज्येष्ठ नागरिक महासंघाच्या अध्यक्षा वृषाली मरळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शहरातील विविध भागांतील मोठ्या संख्येने ज्येष्ठ नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमात मतदान जनजागृतीपर विशेष पथनाट्य व फ्लॅशमॉबचे सादरीकरण करण्यात आले. या सादरीकरणांतून लोकशाही प्रक्रियेत मतदानाचे महत्त्व, नागरिकांची जबाबदारी आणि मताधिकाराचे मूल्य प्रभावीपणे अधोरेखित करण्यात आले. यावेळी उपस्थित शेकडो ज्येष्ठ नागरिकांना सामूहिकरीत्या मतदानाची शपथ देण्यात आली.

> "ज्येष्ठ नागरिक हे समाजाचे मार्गदर्शक असतात. त्यांनी मतदानाचा संकल्प करून दिलेला संदेश समाजातील प्रत्येक घटकासाठी प्रेरणादायी आहे. येत्या १५ जानेवारी रोजी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावून लोकशाही अधिक सक्षम करावी."
> — **तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

"आम्ही भारताचे नागरिक, लोकशाहीवर निष्ठा ठेवून प्रतिज्ञा करतो की, आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करू, मुक्त, निःपक्षपाती व शांततापूर्ण वातावरणात होणाऱ्या निवडणुकांचे पावित्र्य राखू आणि कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करू," अशी शपथ उपस्थितांनी घेतली. यासोबतच 'आम्ही स्वतः मतदान तर करणारच, शिवाय इतर नागरिकांनीही मतदान करावे यासाठी जनजागृती करू,' असा निर्धारही ज्येष्ठ नागरिकांनी व्यक्त केला.

# धक्कादायक! महापालिका निवडणुकीत बाणेर-बालेवाडीत पैशांचा 'धूर'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक तोंडावर असताना बाणेर-बालेवाडी परिसरात पैशांच्या आमिषाने मतदारांना फूस लावण्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. बाणेर-बालेवाडी प्रभाग क्रमांक ९ मधील मतदारांना पैसे देऊन मतदान प्रभावित करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी बाणेर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, या कारवाईत एकूण २ लाख ६३ हजार रुपयांची रोकड जप्त करण्यात आली आहे.

बाणेर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांना बाणेर भागातील एका गॅरेजजवळ दोघे जण थांबून मतदारांना राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना मतदान करण्यासाठी पैशांचे आमिष दाखवत असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच पोलीस निरीक्षक सावंत यांनी तत्काळ निवडणूक आयोगाच्या भरारी पथकाला कळवून पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेतली. कारवाईदरम्यान एका संशयिताला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे असलेली दुचाकी बालेवाडी येथील एका व्यक्तीच्या मालकीची असल्याचे तपासात निष्पन्न झाले. दुचाकीच्या डिक्कीतून दीड लाख रुपयांची रोकड पोलिसांनी जप्त केली. त्यानंतर पोलिस पथकाने दुचाकी मालकाच्या बालेवाडीतील निवासस्थानी छापा टाकला असता, तेथून आणखी एक लाख रुपयांची रोकड हस्तगत करण्यात आली.

मतदारांना पैसे वाटप करण्यासाठी गॅरेजची जागा उपलब्ध करून दिल्याच्या आरोपावरून गॅरेज चालकासह तिघांविरुद्ध बाणेर पोलीस ठाण्यात भारतीय न्यायसंहिता कलम १७० व १७३ अंतर्गत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांनी दिली.

निवडणुकीदरम्यान अशा प्रकारांवर कडक कारवाई सुरू राहणार असून, मतदारांनी कोणत्याही आमिषाला बळी न पडता निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'वॉकेथॉन फॉर मतदान'द्वारे लोकशाहीचा जागर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी आणि प्रत्येक मतदारामध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण व्हावी, यासाठी महापालिकेच्या वतीने स्वीप उपक्रमांतर्गत विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून निगडी येथील दुर्गादेवी टेकडीच्या पायथ्याशी आज सकाळी 'वॉकेथॉन फॉर मतदान' या विशेष जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध अभिनेत्री तसेच पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक मतदान जनजागृतीच्या ब्रँड ॲम्बेसिडर श्रेया बुगडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' अशा जोशपूर्ण घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. शेकडो नागरिक, युवक, महिला आणि पर्यावरणप्रेमी प्रभातफेरीत सहभागी झाले होते.

महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली हा उपक्रम राबविण्यात आला. अभिनेत्री श्रेया बुगडे यांच्या हस्ते मतदान जनजागृती पत्रकांचे वितरण करून प्रभातफेरीची सुरुवात करण्यात आली.

# पुनावळे गावच्या सुपुत्राला महापालिकेत पाठवा – सचिन आहेर यांचे आवाहन

## प्रभाग क्र. २५ मध्ये शिवसेना (उबाठा) उमेदवार चेतन पवार व सागर ओव्हाळ यांची उत्स्फूर्त पदयात्रा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २५ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने प्रचाराला वेग आला आहे. पुनावळे गावचे सुपुत्र, शिवसेनेशी एकनिष्ठ असलेले युवा सेनेचे अधिकारी चेतन महादेव पवार (ड) आणि सागर विजय ओव्हाळ (अ) यांना बहुमताने निवडून देऊन महापालिकेत पाठवा, असे आवाहन शिवसेना (उबाठा) पक्षाचे



संपर्क प्रमुख सचिन आहेर यांनी केले.

सचिन आहेर यांच्या उपस्थितीत नुकतीच उमेदवार चेतन पवार व सागर ओव्हाळ यांनी नृसिंह मंदिर, म्हातोबा मंदिर, गणेश मंदिर येथे दर्शन घेऊन प्रचार पदयात्रेला सुरुवात केली. यावेळी आहेर यांनी मतदारांशी संवाद साधत, "स्थानिक प्रश्न जाणणारे, सामान्य नागरिकांशी थेट नातं असणारे उमेदवार महापालिकेत गेले तरच प्रभागाचा खरा विकास साधता येईल," असा विश्वास व्यक्त केला. शुक्रवारी (दि. ९) म्हातोबा मंदिर, वाकड गावठाण येथून या पदयात्रेचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. म्हातोबा मंदिर ते उत्कर्ष चौक, दत्त मंदिर, माऊली चौक, यमुना नगर, कॉलनी, सद्गुरू कॉलनी, आदर्श कॉलनी, अष्टविनायक कॉलनी आणि प्रभात कॉलनी या भागातून काढण्यात आलेल्या पदयात्रेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अनेक ठिकाणी नागरिकांनी फुलांच्या पाकळ्या उधळून उमेदवारांचे स्वागत केले, तर महिला भगिनींनी औक्षण करून शुभेच्छा दिल्या. या पदयात्रेत तरुणाईसह ज्येष्ठ नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग दिसून आला.

यावेळी बोलताना सचिन आहेर म्हणाले, "पुनावळे, ताथवडे आणि वाकड परिसरातील विकासासाठी स्थानिक, प्रामाणिक आणि कार्यकर्त्यांच्या बळावर उभे राहिलेले प्रतिनिधी महापालिकेत जाणे गरजेचे आहे. चेतन पवार व सागर ओव्हाळ हे दोघेही जनतेच्या प्रश्नांसाठी कायम रस्त्यावर उतरलेले कार्यकर्ते आहेत."

या प्रचारादरम्यान सामाजिक कार्यकर्ते तानाजी विनोदे, रामदास पवार, अविनाश पवार, संजय पवार, पांडुरंग शिंदे, किसन गराडे, शांताराम सपकाळ, राकेश पवार, बाळासाहेब पवार, धनंजय पवार, किरण पवार, विजय दगडे, रोहन वाघेरे, सुमित निकाळजे, गणेश विनोदे, संतोष कदम, बाळासाहेब ओव्हाळ, विनोद ओव्हाळ, कमलेश ओव्हाळ, राहुल पवार, राजू पवार, स्वप्निल पवार, कृष्णा पवार, योगेश पवार, संकेत पवार, अक्षय भोसले यांच्यासह ताथवडे, पुनावळे आणि वाकड परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांच्या पत्रातून पालकांपर्यंत मतदानाचा संदेश

## 'प्रिय आई–बाबा, पत्रास कारण की...' उपक्रमातून लोकशाहीची जाणीव रुजवण्याचा महापालिकेचा अभिनव प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** लोकशाहीची जाणीव आणि मताधिकाराचे महत्त्व लहान वयातच विद्यार्थ्यांच्या मनात रुजावे, तसेच त्यांच्यामार्फत पालकांपर्यंत मतदानाचा संदेश प्रभावीपणे पोहोचावा, या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयात मतदान जनजागृतीचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. 'प्रिय आई–बाबा, पत्रास कारण की...' या अभिनव कार्यक्रमात शेकडो विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांना पत्र लिहून १५ जानेवारी रोजी मतदान करण्याचे भावनिक आवाहन केले.



महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वीप (SVEEP) उपक्रमांतर्गत आयोजित या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त ममता शिंदे यांच्या प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी प्रशासन अधिकारी संगीता बांगर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, शाळेच्या पर्यवेक्षिका वैशाली गायकवाड, शिक्षकवर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात मतदान जनजागृती पथनाट्याने झाली. रक्तदानामुळे व्यक्तीचा जीव वाचतो, तर मतदानामुळे लोकशाही जिवंत राहते, असा प्रभावी संदेश या पथनाट्यातून देण्यात आला. त्यानंतर सादर करण्यात आलेल्या फ्लॅश मॉबमधून लोकशाहीतील मताधिकाराचे महत्त्व आणि नागरिक म्हणून असलेली जबाबदारी विद्यार्थ्यांनी सर्जनशील पद्धतीने मांडली.

यावेळी विद्यार्थिनी वेदिका जाधव हिने 'प्रिय आई–बाबा, पत्रास कारण की...' या उपक्रमांतर्गत स्वतःच्या पालकांना लिहिलेल्या पत्राचे वाचन करत लोकशाहीप्रती विद्यार्थ्यांच्या भावना शब्दबद्ध केल्या. तिने आगामी महापालिका निवडणुकीत मतदान करण्याचे कळकळीचे आवाहन केले. यानंतर विद्यार्थ्यांना पालकांसाठी लिहिलेली पत्रे वाटप करण्यात आली, तर शिक्षकांना मतदानाची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर आभार प्रदर्शन पर्यवेक्षिका वैशाली गायकवाड यांनी मानले.

> "आजची मुले उद्याचे जबाबदार नागरिक आहेत. त्यांच्या माध्यमातून पालकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचवण्यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी पालकांकडे मतदानासाठी आग्रह धरल्यास लोकशाही अधिक सक्षम होईल."
> — **तृप्ती सांडभोर,** अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

> "लोकशाही बळकट होण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग आवश्यक आहे. लहान वयातच मतदानाचे महत्त्व विद्यार्थ्यांमध्ये रुजल्यास तेच विद्यार्थी पुढे जबाबदार नागरिक घडतात. हा उपक्रम मतदानाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण करेल."
> — **ममता शिंदे,** उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# मतदान जनजागृतीसाठी रविवारी 'भव्य विंटेज कार रॅली'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होत असून, मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने महापालिकेच्या वतीने येत्या रविवारी (दि. ११ जानेवारी) 'भव्य विंटेज कार रॅली व प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

रॅलीची सुरुवात सकाळी ९ वाजता पिंपळे सौदागर येथील लिनिअर गार्डन येथून होणार असून, लांडेवाडी चौक, संत तुकाराम नगर, पिंपरी चौक, भाटनगर मार्गे चिंचवड, प्रेमलोक पार्क, आकुर्डी चौक, म्हाळसाकांत चौक असा मार्ग घेत रॅली निगडी येथील नियोजित महापौर निवास मैदान येथे समारोपाला पोहोचणार आहे. त्यानंतर तेथे विंटेज कार व दुर्मिळ बाईकचे प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. या रॅलीत विविध कंपन्यांच्या ऐतिहासिक व दुर्मिळ कार नागरिकांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार असून, या माध्यमातून मतदानाचे महत्त्व अधोरेखित करण्यात येणार आहे. आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर आणि उपायुक्त अण्णा बोदडे यांच्या अधिपत्याखाली स्वीप कार्यक्रमांतर्गत शहरात विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकशाही बळकट करण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असून, मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### वडगाव आनंद शाळेत बालआनंदी बाजार; उलाढाल ४५ हजार रुपये

**जुन्नर :** खामुंडी वडगाव आनंद (ता. जुन्नर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शनिवारी 'बालआनंदी बाजार' भरला गेला. मुलांनी स्वतःच्या पिकवलेल्या भाजीपाला व पालकांच्या मदतीने तयार केलेले खाद्यपदार्थ विक्रीस आणले. खरेदीसाठी ग्रामस्थ उत्साहाने सहभागी झाले. यंदा अनेक विद्यार्थ्यांनी डिजिटल पेमेंटचा उपयोग केला. सुट्टे पैसे अचूक परत देत व्यवहार कौशल्य प्रदर्शित झाले. या उपक्रमातून ४५ हजार रुपयांहून अधिक उलाढाल झाली. शाळा व्यवस्थापन, शिक्षक व पालकांच्या प्रयत्नांनी कार्यक्रम यशस्वी झाला; मुलांनी संपल्यानंतर परिसर स्वच्छ केला, हा अनुभव प्रेरणादायी ठरला.

### महिलांचे दागिने लंपास; दोन घटनांनी खळबळ

**आळे :** शिरूर तालुका व परिसरात पत्ता विचारण्याच्या बहाण्याने महिलांचे दागिने लुटण्याच्या दोन घटना घडल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पुणे-नगर महामार्गावरील सरदवाडी न्हावरा फाटा येथे रोहिणी सरोदे यांच्या गळ्यातील दोन तोळ्यांचे मिनी गंठण दुचाकीवरील चोरट्यांनी हिसकावले. त्यानंतर जोशीवाडी येथे रंजना मेंगवडे यांनाही याच पद्धतीने लुटण्यात आले. दोन्ही घटनांत चार तोळे दागिने चोरीला गेले.

### शिरूर-पाबळ रस्त्याची दुरवस्था; नागरिकांचा रोष

**ओझर :** शिरूर-पाबळ रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उदासीन कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. रस्त्यावरील खड्डे नीट न बुजवता निकृष्ट दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच शास्त्रीय निकष न पाळता बसवलेले स्पीड ब्रेकर अपघातांना कारणीभूत ठरत आहेत. शिक्षक कॉलनीतील सेंट जोसेफ स्कूल परिसरात यापूर्वी अनेक अपघात झाले आहेत.

## पुणे-अहिल्यानगर मार्गातील नागरिक संतापित; पावसाळ्यात संपर्क तुटण्याची भीती; आंदोलनाचा इशारा

# 'म्हसे-अण्णापूर' पुलाचे काम पाच वर्षांपासून रखडले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**शिरूर :** पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यांना जोडणारा घोड नदीवरील 'म्हसे-अण्णापूर' पूल मंजुरीनंतर पाच वर्षे उलटूनही अद्याप अपूर्ण अवस्थेत आहे. ₹१०.२५ कोटींचा निधी मंजूर असलेल्या या महत्त्वाच्या प्रकल्पाचे उद्घाटन २०२३ मध्ये झाले तरी काम ठप्प असल्याने स्थानिक नागरिक, विद्यार्थी, शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते संताप व्यक्त करत आहेत.

सध्या पुलाचे खांब व संरचना अर्धवट अवस्थेत आहेत. कामासाठी आणलेले लोखंडी साहित्य उघड्यावर ठेवले गेले असून गंजले आहे. नागरिकांना भीती आहे की, हे गंजलेले साहित्य भविष्यात वापरल्यास पुलाच्या मजबुतीवर परिणाम होऊ शकतो आणि सार्वजनिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल. विशेष म्हणजे, पुलाच्या कामाच्या ठिकाणी अनिवार्य असलेला माहिती फलक ही लावण्यात आलेला नाही. पूल न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास, शेतकऱ्यांना शेतीसाठी व रुग्णांना उपचारासाठी मोठा वळसा घालावा लागतो. पावसाळ्यात घोड नदीला पूर आल्यास संपर्क तुटतो, त्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर होते. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, खर्चवाढ करण्यासाठी काम जाणीवपूर्वक लांबवले जात असल्याचा संशय व्यक्त केला जातो.

सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित प्रशासनाकडे निवेदनाद्वारे या प्रकरणाची तातडीने चौकशी करून पुलाचे काम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. काम सुरू न झाल्यास शिरूर तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे डेप्युटी इंजिनिअर श्रीपाद बालशटवार यांनी याबाबत सांगितले, "मी नुकताच या प्रकल्पाचा चार्ज घेतला आहे. गेल्या काही काळात अधिक पाणी व मुसळधार पावसामुळे कामास उशीर झाला. मात्र लवकरच पुलाचे काम पुन्हा सुरू करण्यात येईल."

पुल प्रकल्पाच्या अपूर्णतेमुळे या परिसरातील रहिवासी अनेक समस्यांना सामोरे जात आहेत. विद्यार्थी शाळा किंवा महाविद्यालयासाठी मोठ्या अंतरावरून जातात, तर रुग्णांना वैद्यकीय उपचारासाठी अतिरिक्त वेळ आणि खर्च करावा लागतो. शेतकऱ्यांना उत्पादनाचे भांडवल आणि बाजारात पोहोचण्यासाठी अधिक वेळ आणि प्रवासाचा त्रास सहन करावा लागतो. यामुळे पुलाची महत्वता स्पष्ट होते, कारण हा पूल केवळ दोन जिल्ह्यांचा संपर्क नाही, तर आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टीनेही या भागाचा जीवनसत्व आहे. सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांनी या प्रकल्पाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी पुलाच्या कामात झालेल्या विलंबाचे कारण, निधीचा वापर, सामग्रीची स्थिती आणि भविष्यातील सुरक्षिततेसंबंधी चिंता प्रशासनासमोर मांडली आहे. स्थानिकांनी मागणी केली आहे की, कामाच्या सुरुवातीस प्रकल्पाबाबत माहिती फलक लावणे, गुणवत्ता तपासणे आणि काम वेळेत पूर्ण करण्यासाठी तातडीने नियोजन करणे आवश्यक आहे.

पुल प्रकल्पामुळे या भागातील रहिवाशांचा विश्वास प्रशासनावर आहे. काम पुन्हा सुरू होऊन जलद पूर्ण होण्याची अपेक्षा नागरिकांना आहे. स्थानिकांनी या प्रकल्पाला सामाजिक सहभाग आणि देखरेखीची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. त्यांनी प्रशासनाला इशारा दिला की, काम पूर्ण न झाल्यास नागरिक शिरूर तहसील कार्यालयासमोर आंदोलन करतील, जे या प्रकल्पाच्या तातडीच्या महत्वाकडे लक्ष वेधते. या अपूर्ण प्रकल्पामुळे निर्माण झालेल्या समस्यांवर नियंत्रण मिळविणे आवश्यक असून, कामाच्या सुरुवातीस योग्य सामग्रीचा वापर, गुणवत्तापूर्ण बांधकाम आणि सुरक्षितता सुनिश्चित करणे महत्त्वाचे आहे. पुलाचे काम पूर्ण झाल्यावरच या भागातील रहिवाशांना सुलभता, सुरक्षितता आणि दैनंदिन जीवनात सुधारणा मिळणार आहे, असे स्थानिक नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते सांगत आहेत.

# पिंपळेश्वर कावड सोहळा भीमाशंकरकडे प्रस्थान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी :** श्री पिंपळेश्वर सेवा समिती, पिंपरी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने श्री क्षेत्र पिंपळेश्वर मंदिर, पिंपळवंडी येथून शनिवार (दि. 10) सकाळी पायी कावड सोहळा भीमाशंकरकडे प्रस्थान केला. गेल्या अकरा वर्षांपासून चालत आलेल्या या कावड सोहळ्याचा यावर्षीचा तपपूर्ती सोहळा उत्साहात साजरा होत आहे.

> अकरा वर्षांपासून चालत आलेला तपपूर्ती सोहळा उत्साहात सुरू

सोहळ्याच्या प्रस्थानापूर्वी पहाटेच श्री पिंपळेश्वर महादेवाचे अभिषेक व जलपूजन करण्यात आले, तसेच पालखी पूजन करून हर हर महादेवच्या गजरात कावड सोहळ्याला सुरुवात झाली. हा कावड सोहळा पिंपळवंडी स्टँड, नारायणगाव, वारूळवाडी, गुंजाळवाडी, रामवाडी, गिरवली, घोडेगाव, राजपूर मार्गे मंगळवारी (दि. 13) भीमाशंकर येथे पोहोचणार आहे. भीमाशंकर येथे अभिषेक आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे.

बुधवारी (दि. 14) सायंकाळी कावड पिंपळवंडी येथे परतणार असून गुरुवारी सकाळी नऊ ते अकरा वाजता ह. भ. प. गुलाब महाराज खालकर आर्वी यांचे कीर्तन आयोजित आहे. त्यानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता केली जाणार आहे.

या कावड सोहळ्याचे आयोजन संस्थापक विकास बाजीराव काकडे, अध्यक्ष वसंत शेठ वाघ, उपाध्यक्ष बाबाजी दामू काकडे, कार्याध्यक्ष गजानन मोढवे, सचिव राकेश पवार, सहसचिव रवींद्र बेल्हेकर, खजिनदार अविनाश वाघ, तसेच सदस्य बाबाजी शांताराम काकडे, नारायण काकडे, निलेश काकडे व श्रीराम निमसे यांनी केले आहे.

प्रस्थान प्रसंगी पिंपळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष मंगेश अण्णा काकडे, सरपंच मेघताई काकडे, संगीताताई वाघ, सत्यवान काकडे यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# पारगावच्या ढोबळे मळ्यात दिवसा ढवळ्या बिबट्याचे दर्शन

## ऊसतोड सुरू असताना मक्याच्या शेतात दबा; कामगारांमध्ये भीती

■ दैनिक राज्य लोकतंत्र





**बनकरफाटा :** जुन्नर तालुक्यातील आणे येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्या वेतनातील अपहार प्रकरणात ओतूर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत अपहार केलेली संपूर्ण रक्कम फिर्यादीस परत करून दिली आहे. या कारवाईमुळे पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

विष्णु देवराम दाते (रा. आणे, ता. जुन्नर, जि. पुणे) हे सेवानिवृत्त मुख्याध्यापक असून, त्यांच्या सातव्या वेतन आयोगातील तिसरा व चौथा हप्ता अशी एकूण १ लाख ६० हजार ३०१ रुपये रक्कम चुकून चिंतामण मारुती तळपे (रा. केवाडी, ता. जुन्नर) यांच्या बँक खात्यावर जमा झाली होती. ही रक्कम शाळेच्या बँक खात्यात वर्ग करण्याबाबत फिर्यादी यांनी वेळोवेळी आरोपीस सांगितले होते. मात्र आरोपीने ती रक्कम परत न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरून अपहार केल्याचे उघड झाले. या प्रकरणी दिनांक २० जून २०२५ रोजी ओतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार आनंदा भवारी यांच्याकडे देण्यात आला. सखोल तपासाअंती आरोपीकडून १,६०,३०१ रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात पोलिसांना यश आले.

> सेवानिवृत्त मुख्याध्यापकांच्या वेतनाची १.६० लाखांची रक्कम जप्त करून केली परतफेड

जप्त केलेली संपूर्ण रक्कम दिनांक ८ जानेवारी २०२६ रोजी ओतूर पोलिसांनी फिर्यादी विष्णु देवराम दाते यांना परत केली. त्यामुळे दीर्घकाळ चाललेल्या या प्रकरणाचा सुखद शेवट झाला.

ही कारवाई संदीप सिंह गिल, पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण, रमेश चोपडे, अपर पोलीस अधीक्षक, धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी (जुन्नर विभाग) यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ओतूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक लहु थाटे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली. तपास पथकात पो.हवा. आनंदा भवारी, महिला पो.हवा. भारती भवारी व पो.हवा. विलास कोंढावळे यांचा सहभाग होता.

ओतूर पोलिसांच्या या कार्यवाहीमुळे नागरिकांमध्ये विश्वास दृढ झाला असून, अपहार प्रकरणात न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# जवळे ग्रामपंचायतीत महिलांसाठी 'आरी वर्क' कौशल्य विकास प्रशिक्षण संपन्न



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यात सर्वार्थाने प्रगतशील गाव म्हणून ओळख असलेल्या जवळे ग्रामपंचायतीच्या वतीने महिलांच्या सर्वांगिण विकासासाठी आणखी एक प्रभावी उपक्रम राबविण्यात आला. मुख्यमंत्री पंचायतराज अभियानाच्या निमित्ताने १५ वा वित्त आयोग निधीतून महिलांसाठी कौशल्य विकास योजनेअंतर्गत 'आरी वर्क' प्रशिक्षण यशस्वीपणे पार पडले.

या दहा दिवसीय प्रशिक्षणात पर्याय प्रतिष्ठानचे अध्यक्ष तसेच यशदाचे प्रशिक्षक वामन बाजारे आणि ज्योती पवार यांनी महिलांना आरी वर्कच्या विविध डिझाईन्स, बारकावे आणि प्रत्यक्ष कलाकृती तयार करण्याचे सखोल प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण काळात महिलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवत उत्कृष्ट कलाकृती साकारल्या.

महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे सांगताना आदर्श सरपंच वृषाली उत्तम शिंदे पाटील म्हणाल्या की, "महिलांना स्वावलंबी बनविणे आणि त्यांच्यातील कौशल्यांना व्यासपीठ देणे हे ग्रामपंचायतीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. अशा प्रशिक्षणामुळे महिलांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील." प्रशिक्षणाच्या शेवटी करण्यात आलेल्या स्पर्धेत कल्पना खालकर यांना प्रथम क्रमांक, नयन खालकर यांना द्वितीय, मोनिका गावडे यांना तृतीय तर अश्विनी वाघ यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सरपंच वृषाली ताई शिंदे, शुभांगी खालकर, हरिचंद्र शिंदे, उत्तम शिंदे पाटील, पंढरीनाथ टाव्हारे, राजेंद्र वाळुंज, महादेव शिंदे, अशोक लोखंडे, भूपेंद्र वाळुंज यांच्यासह मोठ्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाबाबतची माहिती ग्रामविकास अधिकारी शीला साबळे यांनी दिली.

# जुन्नर वकील बार असोसिएशनतर्फे भव्य कायदेविषयक शिबिर





■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील नागरिक, विद्यार्थी व कायदे क्षेत्रातील व्यावसायिकांमध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने जुन्नर तालुका विधी सेवा समिती व जुन्नर तालुका वकील बार असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले. हे शिबिर दि. ८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता शंकरराव बुट्टे पाटील महाविद्यालय, जुन्नर येथे उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान जिल्हा न्यायाधीश-१ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश माननीय एस. बी. शेलार यांनी भूषविले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी कायद्याची मूलभूत माहिती प्रत्येक नागरिकाला असणे किती आवश्यक आहे, यावर भर दिला. समाजातील दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदेविषयक शिबिरे महत्त्वाची भूमिका बजावतात, असे प्रतिपादन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जुन्नर तालुका वकील बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. हेमंत हाडवळे यांनी केले. त्यांनी शिबिराच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट करत, नागरिकांमध्ये कायदेविषयक जाणीव वाढविणे हेच या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे सांगितले. या शिबिरात विविध महत्त्वाच्या व समकालीन विषयांवर तज्ज्ञ वकिलांनी मार्गदर्शन केले. ॲड. राजेंद्र कोल्हे यांनी पोस्को कायदा याविषयी सविस्तर माहिती देत, बालकांच्या संरक्षणासाठी या कायद्याचे महत्त्व स्पष्ट केले. ॲड. सोमनाथ कोकणे यांनी बालविवाह प्रतिबंध कायदा या विषयावर मार्गदर्शन करत, समाजातील रूढीपरंपरांमुळे होणारे दुष्परिणाम अधोरेखित केले.

# डिंभे धरणाचा उजवा कालवा बनतोय 'प्लास्टिक कचरा वाहिनी'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यासह लगतच्या तालुके व जिल्ह्यांसाठी जीवनवाहिनी ठरलेले डिंभे धरण सध्या शेतीसाठी पाण्याचे आवर्तन सोडत आहे. मात्र या पाण्यासोबतच मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा घन कचरा वाहून नेला जात असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. झाडे-झुडपांच्या गर्दीत आधीच हरवून गेलेला डिंभे धरणाचा उजवा कालवा आता अक्षरशः कचऱ्याचा प्रवाह बनल्याचे दिसून येत आहे.

> शेतीच्या पाण्यासोबत वाहतोय घन कचरा; जलसंधारण विभागाच्या दुर्लक्षावर नागरिकांचा सवाल

जारकरवाडी (ता. आंबेगाव) लगतच्या धामणी खिंड - ज्ञानेश्वर मंदिर परिसरातून जाणाऱ्या कालव्यात मोठ्या प्रमाणावर प्लास्टिक कचरा साठलेला आहे. शेतकऱ्यांनी पाणी उचलण्यासाठी टाकलेल्या लोखंडी पाईपलाईनला हा कचरा अडकून राहिला असून, त्यात प्लास्टिक पिशव्या, पाण्याच्या व शीतपेयांच्या बाटल्या, प्लास्टिक फोम, पत्रावळी, तसेच विविध प्रकारच्या दारूच्या प्लास्टिक बाटल्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे रिकाम्या पाण्याच्या बाटल्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. दैनंदिन जीवनात सर्रास वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तू फुटल्या किंवा निकामी झाल्या की त्या कचराकुंडीत न टाकता थेट कालव्यात फेकल्या जात असल्याचे वास्तव आहे. प्लास्टिकचे विघटन होण्यासाठी अनेक वर्षांचा कालावधी लागतो. याचा थेट परिणाम पर्यावरणावर, सजीवसृष्टीवर आणि अन्नसाखळीवर होत असूनही, प्लास्टिक वापर कमी करण्याकडे नागरिकांचा कल दिसत नाही.

सध्या डिंभे धरणाचा उजवा कालवा पाण्याऐवजी प्लास्टिक वाहून नेणारा कालवा बनत चालला आहे. या गंभीर समस्येकडे जलसंधारण विभागाने सोईस्करपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिक व शेतकऱ्यांकडून केला जात आहे.

# पूर्व आंबेगावात टोमॅटोची लागवड सुरू; शेतकरी बांधणीसाठी व्यस्त

## मजुरांची टंचाई; सावड पद्धतीत बांधणी सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**रांजणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, जारकरवाडी, धामणी, पोंदेवाडी, लाखणगाव परिसरात सध्या शेतकरी टोमॅटोची लागवड आणि बांधणी करण्यासाठी व्यस्त आहेत. जानेवारी महिन्यातील अनुकूल हवामानामुळे शेतकरी टोमॅटो लागवडीस प्राधान्य देत आहेत. या काळात वळवाचा किंवा अवकाळी पावसाचा धोका नसल्याने टोमॅटोला योग्य पोषण मिळते आणि शेतकऱ्यांना हमखास बाजारभाव मिळतो, असा अनेक वर्षांचा अनुभव टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना आहे.

**सावड पद्धतीमुळे मजुरांची बचत**

सध्या मजुरांची टंचाई भासत असल्याने स्थानिक शेतकऱ्यांनी टोमॅटोची बांधणी सावड पद्धतीने करणे सुरू केले आहे. निरगुडसर येथील टोमॅटो उत्पादक विजय टाव्हरे यांनी सांगितले की, टोमॅटो बांधणीसाठी जास्त रोजंदारी लागल्यामुळे शेतकऱ्यांनी हा पर्याय निवडला आहे. काही शेतकरी बांधणीस तर काही शेतकरी टोमॅटो तोंडणीच्या कामात व्यस्त आहेत.

**रोगप्रतिबंधक उपाय आणि फळमाशी नियंत्रण**

टोमॅटोला करपा, भूरी व इतर रोगांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होतो. त्यामुळे महागडी औषधे फवारणी करावी लागतात, ज्यामुळे उत्पादन खर्च वाढतो. फळमाशी नियंत्रणासाठी शेतकऱ्यांनी टोमॅटोच्या फडात कामगंध सापळे किंवा पिवळे चिकट सापळे लावावेत. त्यावर चिकटलेल्या माशा पाच ते सहा दिवसांनी काढून त्यावर ग्रिस किंवा एरंड तेल लावल्यास फळमाशी आटोक्यात येऊ शकते, असे अनुभवसिद्ध शेतकरी सांगत आहेत.

सध्या या परिसरात टोमॅटोला चांगला बाजारभाव मिळत असून शेतकऱ्यांनी आपल्या लागवडीची काळजी घेतली तर त्यांनी लाभ मिळवण्याची चांगली संधी आहे.

जर तुम्हाला हवे असेल तर मी हे 320 शब्दांपेक्षा कमी करून 250 शब्दांत, न्यूजपेपरसारखे आकर्षक लेआउटसह तयार करू शकतो, ज्यामुळे छापण्यासाठी अधिक योग्य होईल.

# बुधरानी हॉस्पिटलतर्फे मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पाबळ :** पुण्यातील सुप्रसिद्ध बुधरानी हॉस्पिटल यांच्या वतीने पाबळ येथे नागरिकांसाठी मोफत मोतीबिंदू निदान व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत पाबळ येथील नागेश्वर हॉस्पिटल येथे होणार आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा सहज उपलब्ध व्हावी, या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून, या शिबिरामध्ये अनुभवी नेत्रतज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली डोळ्यांची सविस्तर तपासणी करण्यात येणार आहे. विशेषतः मोतीबिंदू, काचबिंदू तसेच इतर नेत्रविकारांचे प्राथमिक निदान मोफत केले जाणार आहे.

तपासणीदरम्यान ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता भासेल, त्यांच्यासाठी बुधरानी हॉस्पिटल, पुणे येथे अत्यल्प व सवलतीच्या दरात शस्त्रक्रियेची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रुग्णांची सुरक्षित वाहतूक, मार्गदर्शन व पुढील उपचारांसाठी आवश्यक माहिती देखील शिबिरस्थळी दिली जाणार आहे.

## बोगस कामांची पोलखोल; ६२ कोटींच्या विकासाचा दावा; पदयात्रा व जाहीर सभेत कार्यकर्त्यांचा संताप

# "आमदारांच्या गावात विकास कुठे?" – राहू येथे विरोधकांचा जाहीर सवाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**दौंड :** दौंड मतदारसंघातील विद्यमान भाजप आमदारांनी स्वतःच्या राहू गावात सुमारे ६२ कोटी ७३ लाख रुपयांची विकासकामे केल्याचा गवगवा केला असला, तरी हा विकास नेमका कुठे झाला, असा सडेतोड जाहीर सवाल विरोधक व स्थानिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. आमदारांच्या दाव्यांना आव्हान देत राहू गावात जनजागृती पदयात्रा काढून मुख्य चौकात जाहीर सभा घेण्यात आली. या सभेत आमदारांच्या कामांची पोलखोल केल्याचा दावा करण्यात आला असून, या घटनेमुळे संपूर्ण दौंड तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

आमदारांनी केलेल्या दाव्यानुसार इतक्या मोठ्या प्रमाणावर विकास झाला असता, राहू हे गाव जिल्हा व राज्यासाठी आदर्श 'विकास मॉडेल' ठरले असते, असा सवाल उपस्थित करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात गावात नवीन इमारती, पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सुविधा, सार्वजनिक शौचालये, नळपाणी योजना, बगीचा, साधी मुतारीसुद्धा नसल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला. शेतकऱ्यांच्या जीवनाशी निगडित विविध कार्यकारी सेवा संस्था डबघाईला आल्याचेही यावेळी सांगण्यात आले. जाहीर सभेत "१०० खाटांचे हॉस्पिटल कुठे आहे?", "कोट्यवधींचा विकास नेमका गेला कुठे?" असे प्रश्न थेट उपस्थित करण्यात आले.

विरोधकांच्या मते, एकाच रस्त्याला वेगवेगळी नावे दाखवून कोट्यावधींचा खर्च कागदोपत्री दाखवण्यात आला असून, या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. याबाबत जनजागृती करण्यासाठी कार्यकर्ते एकत्र आले आणि गावभर फेरी काढत नागरिकांशी संवाद साधला. त्यानंतर मुख्य चौकात सभा घेऊन आमदारांवर जोरदार टीका करण्यात आली.

या जनजागृती व संवाद सभेत ज्येष्ठ विधी तज्ज्ञ ॲड. यशवंत शिंदे, तात्यासाहेब टेळे, रामभाऊ सोनवणे, शांताराम बांदल, सारिका भुजबळ, डॉ. फडतरे यांनी आपापल्या भाषणातून बोगस विकासकामांवर घणाघाती टीका केली. आमदारांच्या दाव्यांमधील विसंगती दाखवून देत, प्रत्यक्ष वास्तव नागरिकांसमोर मांडण्यात आले.

### कार्यकर्त्यांनी पोलखोल केल्याने आमदार अडचणीत

● दरम्यान, "राहू गावाचा खरोखर विकास झाला असेल, तर आमदारांनी तो राज्यभर 'विकास मॉडेल' म्हणून मांडावा," असे थेट आव्हान विरोधकांनी दिले आहे. भीमा साखर कारखाना कर्जप्रकरणी आधीच चर्चा सुरू असताना, आमदारांच्या स्वतःच्या गावातच कार्यकर्त्यांनी पोलखोल केल्याने आमदार अडचणीत आल्याची चर्चा तालुक्यात रंगली आहे.

सभेला मिरवडीचे सरपंच सागर शेलार, सखाराम शिंदे, चेअरमन बाळासाहेब शिंदे, दौंड खरेदी-विक्री संघाचे संचालक पुरुषोत्तम हंबीर, सुभाष कुदळे, मदन नवले, ज्ञानेश्वर शिंदे, दत्तू दुबे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार विठ्ठल थोरात यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिन शिंदे यांनी मानले.

## सारांश वृत्त

### आग्र्यातून ३८ बांगलादेशींची हकालपट्टी

**आग्रा :** आग्रा शहरात बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या ३८ बांगलादेशी घुसखोरांना, त्यामध्ये आठ अल्पवयीन मुलांचा समावेश असून, हद्दपार करण्यात आले आहे. सहाय्यक पोलिस आयुक्त (गुप्तचर) दिनेश सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिकंदरा पोलिस स्टेशन हद्दीतील सेक्टर १५ परिसरात हे बांगलादेशी नागरिक राहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर कारवाई करण्यात आली. अटकेत घेतलेल्या व्यक्तींमध्ये ३० प्रौढ पुरुष व महिलांचा आणि आठ अल्पवयीन मुलांचा समावेश होता. तपासादरम्यान त्यांच्याकडे भारतात राहण्यासाठी आवश्यक अशी कोणतीही वैध कागदपत्रे आढळून आली नाहीत.

### पंजाबमध्ये थंडीचा कडाक्यात वाढ

**चंदीगड :** पंजाबच्या होशियारपूरमध्ये तापमान १.१ अंश सेल्सिअसपर्यंत घसरल्याने शनिवारी पंजाबच्या अनेक भागात थंडी वाढली आहे. होशियारपूर आणि पंजाब आणि शेजारच्या हरियाणातील काही ठिकाणी सकाळी धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाली. अमृतसर येथे १.३ अंश सेल्सिअस, भटिंडा येथे ३.४ अंश सेल्सिअस, फरीदकोट येथे ३.२ अंश सेल्सिअस, पतियाळा येथे ४.४ अंश सेल्सिअस आणि गुरदासपूर येथे ३.२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

### संक्रांतीसाठी हैदराबादहून मूळ गावी रवाना

**हैदराबाद :** पुढील आठवड्यात होणाऱ्या तीन दिवसीय संक्रांती उत्सवासाठी हैदराबादहून हजारो लोक त्यांच्या मूळ गावी रवाना झाले आहेत. महात्मा गांधी बस स्थानक (एमजीबीएस), ज्युबिली बस स्थानक (जेबीएस) आणि इतर प्रमुख बस स्थानके तसेच हैदराबादमधील रेल्वे स्थानकांवर शुक्रवारी सायंकाळपासून प्रवाशांची गर्दी दिसून आली. येत्या काही दिवसांत प्रवाशांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे.

## छाप्यांदरम्यान कागदपत्रे आणि डेटा चोरीची तक्रार

# ईडीच्या कारवाईविरोधात टीएमसी आक्रमक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** आय-पॅक या राजकीय रणनीती संस्थेच्या कार्यालयात आणि तिचे प्रमुख प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) टाकलेल्या छाप्यांदरम्यान कागदपत्रे आणि इलेक्ट्रॉनिक डेटा चोरीला गेल्याच्या आरोपांप्रकरणी कोलकाता पोलिसांनी शनिवारी तपास सुरू केला आहे. या कारवाईदरम्यान उपस्थित असलेल्या केंद्रीय यंत्रणांच्या कर्मचाऱ्यांची ओळख पटवण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. शनिवारी सकाळी शेक्सपियर सारणी पोलिस ठाण्याच्या पथकाने प्रतीक जैन यांच्या लाउडन स्ट्रीट येथील निवासस्थानी भेट देत तेथील सीसीटीव्ही फुटेज आणि डीव्हीआर रेकॉर्डिंग जप्त केले. घरातील कर्मचारी तसेच सुरक्षा रक्षकांचे जबाब नोंदवण्यात



आले असून, संशयितांची ओळख पटताच त्यांना नोटिसा बजावण्यात येतील, अशी माहिती एका वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याने दिली. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दाखल केलेल्या तक्रारींवरून ईडीच्या अज्ञात अधिकाऱ्यांविरोधात अनेक एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. जैन यांच्या लाउडन स्ट्रीट येथील निवासस्थानाशी संबंधित तक्रार शेक्सपियर सारणी पोलिस ठाण्यात, तर सॉल्ट लेक सेक्टर पाच येथील आय-पॅक कार्यालयाशी संबंधित तक्रार बिधाननगरमधील इलेक्ट्रॉनिक कॉम्प्लेक्स पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. या प्रकरणात गुन्हेगारी धमकी, चोरी, गुन्हेगारी अतिक्रमण तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमे आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संगणकाशी संबंधित गुन्हे, अनधिकृत प्रवेश किंवा डेटा नुकसान यासारख्या कृत्यांचा त्यात समावेश आहे. याशिवाय, गुरुवारी सायंकाळी पोलिसांनी एजन्सीविरोधात स्वतःहून (सुओ मोटो) आणखी एक गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, ईडीच्या अधिकाऱ्यांनी गुरुवारी सकाळी सुमारे ६.१५ वाजता प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी शोधमोहीम सुरू केली होती. मात्र, स्थानिक पोलिसांना या छापेमारीची माहिती तब्बल पाच तासांनंतर ई-मेलद्वारे देण्यात आली. माहिती मिळताच पोलिस उपायुक्त (दक्षिण) यांच्यासह वरिष्ठ अधिकारी घटनास्थळी गेले असता ईडी आणि सीआरपीएफच्या जवानांनी त्यांना अडवले आणि काही ठिकाणी लाठीमार झाल्याचा आरोप पोलिसांकडून करण्यात आला आहे. तृणमूल काँग्रेसच्या निवडणुकीशी संबंधित संवेदनशील कागदपत्रे आणि हार्ड डिस्क चोरीला गेल्याचा आरोप मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केल्यानंतर या प्रकरणाला अधिकच राजकीय वळण मिळाले आहे. तक्रारीनुसार, ईडी आणि सीआरपीएफच्या अज्ञात जवानांनी जैन यांच्या निवासस्थानी आणि आय-पॅकच्या कार्यालयात प्रवेश करून महत्त्वाची कागदपत्रे व इलेक्ट्रॉनिक डेटा जप्त केला. पोलिस अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ईडीच्या अधिकाऱ्यांनी ओळखपत्र दाखवले नाही तसेच शोधवॉरंटची प्रतही स्थानिक पोलिसांना देण्यात आली नाही. न्यायालयाने जारी केलेल्या वॉरंटबाबत माहिती मागितली असता पोलिसांना ढकलण्यात आले आणि प्रवेश रोखण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. दरम्यान, पश्चिम बंगाल सरकारने या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल करून, संबंधित बाजू ऐकून घेतल्याशिवाय कोणताही आदेश देऊ नये, अशी मागणी केली आहे.

## इतिहासातून प्रेरणा घेऊन राष्ट्र उभारणी व्हावी: अजित डोभाल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताचे स्वातंत्र्य सहज मिळालेले नसून त्यासाठी देशाने फार मोठी किंमत मोजली आहे. पिढ्यानपिढ्या अपमान, विनाश आणि प्रचंड हानी सहन करावी लागली, असे प्रतिपादन राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांनी शुक्रवारी केले. इतिहासातील या त्यागातून प्रेरणा घेऊन तरुणांनी मूल्ये, हक्क आणि विश्वासांवर आधारित मजबूत व महान भारत उभारण्याचे आवाहन त्यांनी केले. युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या वतीने आयोजित विकसित भारत यंग लीडर्स डायलॉग २०२६ च्या उद्घाटनप्रसंगी हे भाषण झाले. नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे ९ ते १२ जानेवारीदरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमात देशभरातील दोन हजारांहून अधिक तरुण सहभागी झाले आहेत. विविध विषयांवर चर्चा, नवोन्मेष आणि विचारमंथनाच्या माध्यमातून 'विकसित भारत २०४७' या संकल्पनेत तरुणांना सक्रिय भूमिका बजावण्याची संधी देणे, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले. 'विकसित भारत युवा नेतृत्व संवाद'च्या उद्घाटन समारंभात बोलताना डोभाल म्हणाले की, आज दिसणारा स्वतंत्र भारत सहज मिळालेला नाही. पूर्वजांनी अमानुष अत्याचार, असहाय्यतेचे काळ आणि मोठे बलिदान सहन केले. अनेकांना फाशी देण्यात आले, गावे जाळली गेली, संस्कृतीवर घाव घातले गेले आणि मंदिरे लुटली गेली. हे सर्व असहायपणे पाहावे लागले. हा इतिहास आजच्या पिढीसमोर उभा आहे आणि भारतातील प्रत्येक तरुणाच्या मनात राष्ट्रासाठीची ज्वाला प्रज्वलित करण्याचे आव्हान तो देतो, असे त्यांनी सांगितले. इतिहासाचा सूड घ्यावा, हा शब्द कदाचित योग्य नसेल; मात्र सूड ही स्वतःमध्येच एक प्रभावी प्रेरक शक्ती आहे, असे नमूद करत डोभाल म्हणाले की, याचा अर्थ द्वेष नव्हे, तर आपल्या हक्कांवर, कल्पनांवर आणि श्रद्धांवर आधारित भारताला पुन्हा त्याच्या योग्य स्थानावर नेण्याचा निर्धार आहे. भारताची प्राचीन संस्कृती अत्यंत प्रगत आणि शांतताप्रिय होती. भारताने कधीही इतर देशांवर आक्रमणे केली नाहीत, मंदिरे पाडली नाहीत किंवा लुटीसाठी मोहिमा केल्या नाहीत, याची त्यांनी आठवण करून दिली.

## भारतासोबत अफगाणी सहकार्याचा नवा अध्याय

### दिल्लीतील अफगाण दूतावासात नूर अहमद नूर यांची नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अफगाणिस्तानने दिल्लीतील अफगाण दूतावासात नूर अहमद नूर यांची नियुक्ती केल्याची माहिती समोर आली आहे. बदलत्या प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत-अफगाणिस्तान संबंधांना नवी दिशा देण्याच्या दृष्टीने ही नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. यापूर्वी २० डिसेंबर रोजी अफगाणिस्तानचे सार्वजनिक आरोग्यमंत्री मौलावी नूर जलाल जलाली यांनी पाकिस्तानशी संबंध बिघडल्यामुळे अफगाणिस्तानच्या



औषधांच्या गरजांसाठी भारत हा एक प्रमुख पर्यायी भागीदार म्हणून पुढे येत असल्याचे स्पष्ट केले होते. भारताशी सहकार्याचा नवा अध्याय सुरू करण्याचा अफगाणिस्तानचा विचार असल्याचेही त्यांनी सांगितले होते. नवी दिल्ली येथे आयोजित जागतिक आरोग्य संघटनेच्या पारंपरिक औषधांवरील जागतिक शिखर परिषदेसाठी भारत दौऱ्यावर असताना जलाली यांनी भारत-अफगाणिस्तानमधील दीर्घकालीन संबंध आणि आरोग्य क्षेत्रातील विश्वासार्ह भागीदारीवर भर दिला. भारताशी मजबूत संबंध असून सहकार्य वाढवण्याची इच्छा असल्याचे त्यांनी नमूद केले. या भेटीनंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने जलाली यांच्या पहिल्या अधिकृत भारत भेटीचे स्वागत केले आणि बदलत्या प्रादेशिक घडामोडींनंतरही अफगाणिस्तानसाठी भारताची मानवतावादी मदत सुरूच राहील, असे स्पष्ट केले.

## सेन्सॉर बोर्डही केंद्राचे शस्त्र बनले; मुख्यमंत्री स्टॅलिन यांचा आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** चेन्नई सीबीआय, ईडी आणि आयकर विभागापाठोपाठ आता केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळही भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारचे नवे शस्त्र बनत असल्याचा आरोप तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी केला आहे. आमचे सरकार या प्रकाराचा तीव्र निषेध करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिवाकार्तिकेयन अभिनीत 'पराशक्ती' चित्रपटातील काही दृश्ये आणि संवाद केंद्रीय चित्रपट प्रमाणन मंडळाने काढून टाकल्याचे वृत्त समोर आल्यानंतर काही तासांतच मुख्यमंत्री स्टॅलिन



यांची ही प्रतिक्रिया आली. तसेच अभिनेता विजयच्या 'जन नायकन' या चित्रपटाच्या प्रमाणपत्राबाबत सुरू असलेल्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवरही त्यांच्या वक्तव्याला महत्त्व प्राप्त झाले आहे. मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या संक्षिप्त प्रतिक्रियेत नेमके कोणत्या प्रकरणाचा संदर्भ आहे, हे स्पष्ट झाले नाही. मात्र 'पराशक्ती'मधील कपात आणि 'जन नायकन'च्या प्रमाणपत्राला होत असलेला विलंब, या दोन्ही मुद्द्यांमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर गुरुवारी काही कार्यकर्त्यांनी राजकीय नेत्यांना 'जन नायकन'वरील सेन्सॉर निर्बंधांविरोधात आवाज उठवण्याचे आवाहन केले. हा प्रकार अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारा असून, राजकीय भूमिका किंवा संलग्नता न पाहता याचा निषेध झाला पाहिजे, असा त्यांचा दावा आहे. दरम्यान, काँग्रेसच्या काही नेत्यांनी सीबीएफसीच्या कारवाईवर टीका केल्यानंतर डाव्या आणि इतर पक्षांकडूनही प्रतिक्रिया उमटल्या. सीपीएमचे राज्य सचिव पी. षण्मुगम आणि व्हीसीकेचे उपमहासचिव अलूर शाह नवाज यांनी या विषयावर बोलणाऱ्यांवर अप्रत्यक्ष टीका केली. षण्मुगम यांनी म्हटले की, सेन्सॉर बोर्डाने प्रमाणपत्र देण्यास विलंब लावला असतानाही तथाकथित 'जन नायकन' म्हणजेच अभिनेता विजय यांनी अद्याप मौन बाळगले आहे.

# नितीशकुमार यांना भारतरत्न देण्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांना भारतरत्न देण्याची मागणी करणारे पत्र हे पक्षाची अधिकृत भूमिका नसून संबंधित नेत्याचे वैयक्तिक मत आहे, असे स्पष्टीकरण जनता दल (युनायटेड) पक्षाने दिले आहे. ज्येष्ठ नेते आणि माजी खासदार के. सी. त्यागी यांनी ही मागणी केल्यानंतर पक्षातच संभ्रम निर्माण झाला होता. के. सी. त्यागी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून नितीशकुमार यांना 'मौल्यवान रत्न' असे संबोधले होते आणि भाजपप्रणित केंद्र सरकारने त्यांना भारतरत्न देण्याचा विचार करावा, अशी विनंती केली होती. या पत्रात त्यांनी समाजवादी चळवळीतील योगदान, सुशासन, सामाजिक न्याय आणि महिला सक्षमीकरणासाठी केलेल्या कार्याचा उल्लेख केला होता. मात्र या पत्रावर प्रतिक्रिया देताना जनता दल (युनायटेड) पक्षाचे राष्ट्रीय प्रवक्ते राजीव रंजन प्रसाद यांनी स्पष्ट केले की, पक्षाच्या माजी खासदाराने अलीकडच्या काळात केलेली काही विधाने पक्षाच्या विचारसरणीशी आणि अधिकृत भूमिकेशी सुसंगत नाहीत. त्यागी यांनी केलेली ही सर्व मते त्यांच्या वैयक्तिक क्षमतेतून व्यक्त करण्यात आली असून त्यांचा पक्षाशी कोणताही थेट संबंध नाही, असे त्यांनी सांगितले. त्यागी सध्या पक्षातील कोणतेही अधिकृत पद भूषवत आहेत की नाही, याबाबतही पक्षातील पदाधिकाऱ्यांना स्पष्टता नसल्याचे प्रसाद यांनी नमूद केले. त्यामुळे भारतरत्न संदर्भातील मागणी ही जेडीयूची भूमिका म्हणून पाहू नये, असा संदेश देण्यात आला आहे. दरम्यान, के. सी. त्यागी यांनी माजी पंतप्रधान चौधरी चरण सिंह आणि बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकूर यांना भारतरत्न देण्यात आल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. ३० मार्च २०२४ हा दिवस समाजवादी परंपरेतील नेत्यांच्या सन्मानाचा दिवस ठरल्याचे त्यांनी आपल्या पत्रात नमूद केले होते.

## हावड्यात सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्याचा राजीनामा

# मतदार याद्यांच्या पुनरिक्षणावर आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये सुरू असलेल्या मतदार याद्यांच्या विशेष गहन पुनरिक्षण प्रक्रियेदरम्यान आढळलेल्या कथित तार्किक विसंगतींविरोधात हावडा जिल्ह्यातील सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्याने राजीनामा दिल्याने खळबळ उडाली आहे. या प्रक्रियेमुळे समाजातील सीमांत घटकांना मतदानाच्या हक्कापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. पश्चिम बंगाल नागरी सेवा (डब्ल्यूबीसीएस) अंतर्गत ब्लॉक डेव्हलपमेंट ऑफिसर म्हणून कार्यरत असलेल्या आणि सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी (एआरओ) पदाची जबाबदारी सांभाळणाऱ्या मौसमी सरकार यांनी ८ जानेवारी रोजी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यांनी हा राजीनामा संबंधित मतदार नोंदणी अधिकारी तसेच जिल्हा निवडणूक प्रशासनाकडे सादर केला आहे. आपल्या राजीनामा पत्रात मौसमी सरकार यांनी नमूद केले आहे की, २००२ मधील मतदार यादीतील माहिती सीएसव्ही स्वरूपात रूपांतरित



करताना झालेल्या त्रुटींमुळे बीएलओ ॲपमध्ये अनेक प्रकारच्या तार्किक विसंगती निर्माण झाल्या. २००२ मधील मतदार यादी ही पश्चिम बंगालमधील शेवटची विशेष गहन पुनरिक्षण प्रक्रिया होती आणि त्या यादीतील नोंदी 'पवित्र' मानल्या गेल्या. मात्र त्यानंतर निवडणूक आयोगाच्या नियमांनुसार फॉर्म ८ द्वारे अनेक नावे, वय आणि लिंग यामध्ये दुरुस्त्या करण्यात आल्या होत्या.

या दुरुस्त्यांकडे दुर्लक्ष करून जुन्या डेटाशी थेट तुलना केल्यामुळे संतती मॅपिंगमध्ये वडिलांची नावे न जुळणे, वय व लिंगाबाबत चुकीची नोंद दिसणे, तसेच काही ठिकाणी मतदारांची नावे केवळ 'या' अशी अपूर्ण स्वरूपात दिसणे, अशा गंभीर त्रुटी समोर आल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या तथाकथित विसंगतींचा आधार घेऊन अनेक मतदारांना त्यांच्या ओळखीची पुष्टी करण्यासाठी बारा प्रकारची कागदपत्रे मागितली जात आहेत. मात्र समाजातील मोठ्या सीमांत वर्गाकडे अशी कागदपत्रे नसल्याने त्यांना मताधिकारापासून वंचित ठेवण्याचा हा डाव असल्याचा आरोप मौसमी सरकार यांनी केला आहे. एक जबाबदार नागरिक म्हणून अशा प्रक्रियेचा भाग राहणे नैतिकदृष्ट्या चुकीचे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आपल्या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी पदावर राहिल्यास आपण जाणीवपूर्वक देशवासीयांचा विश्वासघात करत असल्याची भावना निर्माण होत आहे. त्यामुळे या पदावरून मुक्त व्हावे, अशी त्यांची इच्छा आहे. मात्र आवश्यकता भासल्यास निवडणूक आयोगाने सोपवलेली इतर कर्तव्ये पार पाडण्यास आपण तयार असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे. नियोजित तार्किक विसंगतींवरील सुनावणीच्या अवघ्या सहा दिवस आधी हा राजीनामा देण्यात आला आहे. मौसमी सरकार यांनी संबंधित मतदार नोंदणी अधिकारी अचिंत्य कुमार मंडल यांना पत्र पाठवून त्यांना एआरओ पदावरून मुक्त करण्याची औपचारिक विनंती केली आहे.

# आयजीआय विमानतळावर ४३ कोटींचा गांजा जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** नवी दिल्ली इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे कस्टम विभागाने मोठी कारवाई करत सुमारे ४३ कोटी १५ लाख रुपयांचा गांजा आणि विदेशी सिगरेट जप्त केली आहे. या प्रकरणात चार भारतीय नागरिकांना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.

कस्टम अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, हे चौघे ५ जानेवारी रोजी बँकॉकहून टीजी-३१५ आणि टीजी-३३१ या दोन उड्डाणांद्वारे दिल्लीला आले होते. ६ जानेवारीला



ग्रीन चॅनलमार्गे बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असताना त्यांच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने अधिकाऱ्यांनी त्यांना थांबवले. तपासणीदरम्यान त्यांच्या सामानाची एक्स-रे तपासणी करण्यात आली. चार ट्रॉली बॅग्समध्ये ३६ पॉलीथिन पाउचमध्ये भरलेला हिरव्या रंगाचा नशीला पदार्थ आढळून आला. प्राथमिक चाचणीत तो गांजा असल्याचे स्पष्ट झाले. जप्त करण्यात आलेल्या गांजाचे एकूण वजन ४३ किलो १३५ ग्रॅम आहे. याशिवाय, आणखी दोन ट्रॉली बॅग्समधून गोल्ड फ्लेक ब्रँडच्या ७६ डंड्या विदेशी सिगरेटही सापडल्या. कस्टम विभागाने सांगितले की, गांजा, सिगरेट आणि तस्करीसाठी वापरलेले साहित्य मिळून एकूण जप्त मालाची अंदाजे किंमत ४३ कोटी १५ लाख रुपये आहे. या प्रकरणी आरोपींविरोधात अमली पदार्थ व मनोप्रभावी द्रव्ये कायदा (एनडीपीएस), १९८५ अंतर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे. त्यांना कलम २०, २३, २९ आणि ४३(ब) अन्वये अटक करण्यात आली असून जप्त माल कलम ४३(अ) अंतर्गत जप्त करण्यात आला आहे.

## निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेवर सवाल

**लखनौ :** समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांनी शनिवारी म्हटले की, मतदारांची संख्या किती रद्द केली जाईल हे भाजपच्या नेत्यांना कसे माहित होते. शनिवारी लखनौ येथे पत्रकारांशी बोलताना यादव म्हणाले की, उत्तर प्रदेशात मतदार याद्यांचे विशेष गहन पुनरिक्षण (एसआयआर) करण्यात आले. बूथ-स्तरीय एजंट्ससह सर्व राजकीय पक्षांनी (बीएलए) या सरावात भाग घेतला. मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध झाल्यानंतर यादव म्हणाले की, ३ कोटी मते काढून टाकण्याबाबत त्यांना भीती वाटत होती.

# सीमेजवळ ड्रोनद्वारे टाकलेली शस्त्रांस्त्रे जप्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**जम्मू :** जम्मू-काश्मीरच्या सांबा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय सीमेजवळ पाकिस्तानकडून ड्रोनच्या माध्यमातून टाकण्यात आलेली शस्त्रांची खेप सुरक्षा दलांनी जप्त केली आहे. अधिकाऱ्यांनी शनिवारी ही माहिती दिली. या कारवाईत दोन पिस्तूल, तीन मॅगझिन, १६ काडतुसे आणि एक ग्रेनेड जप्त करण्यात आले आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पार्श्वभूमीवर दहशतवादी कारवायांचा कोणताही प्रयत्न हाणून पाडण्यासाठी सीमावर्ती भागात सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. सीमा सुरक्षा दल (बीएसएफ) आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या विशेष कारवाई गटाच्या (एसओजी) संयुक्त पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा घगवाल भागातील पालोरा गावात ही कारवाई केली. सीमेपलीकडून ड्रोनच्या संशयास्पद हालचाली झाल्याची माहिती मिळाल्यानंतर संयुक्त पथकाने तात्काळ शोध मोहीम सुरू केली होती. शोधादरम्यान नाल्याच्या काठावर पिवळ्या टेपमध्ये गुंडाळलेले एक संशयास्पद पॅकेट आढळून आले. बॉम्ब निकामी पथकाच्या मदतीने हे पॅकेट सुरक्षितरीत्या उघडण्यात आले. त्यामधून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला. दरम्यान, परिसरात आणखी काही संशयास्पद साहित्य आढळते का, यासाठी शोध मोहीम सुरूच असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## ट्रम्प यांच्या पुढाकाराला उद्योगजगताची सावध प्रतिक्रिया

# व्हेनेझुएलाच्या तेलावर अमेरिकेची नजर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** जागतिक पातळीवर राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्थिरता वाढलेली असताना, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आता व्हेनेझुएलाच्या तेल उद्योगाकडे निर्णायक पावले वळवली आहेत. जगातील सर्वात मोठे कच्च्या तेलाचे साठे असलेला व्हेनेझुएला देश दीर्घकाळापासून पायाभूत सुविधांच्या अभावामुळे अडचणीत सापडला आहे. याच पार्श्वभूमीवर ट्रम्प यांनी अमेरिकन तेल कंपन्यांना पुन्हा व्हेनेझुएलात परत येण्याचे आवाहन करत, किमान १०० अब्ज डॉलर्सची खासगी गुंतवणूक आकर्षित



करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. व्हाईट हाऊसमध्ये तेल उद्योगातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत ट्रम्प यांनी व्हेनेझुएलातील पूर्वी मंजूर झालेल्या तेल प्रकल्पांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करण्याचा मार्ग मोकळा केला जाईल, असे आश्वासन दिले. याआधी सोशल मीडियावर दिलेल्या संदेशात त्यांनी 'बिग ऑइल'कडून किमान १०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक अपेक्षित असल्याचे जाहीर केले होते. त्यांच्या मते, ही गुंतवणूक सरकारी निधीतून नव्हे, तर खासगी कंपन्यांकडून येणार असून अमेरिकन सरकार केवळ संरक्षण आणि राजकीय पाठबळ देईल. या हालचालींना वेग येण्यामागे अमेरिकन लष्कराने व्हेनेझुएलाच्या तेलाशी संबंधित काही टँकर जप्त केल्याची पार्श्वभूमी आहे. ट्रम्प यांनी दावा केला आहे की अमेरिका आता ३० ते ५० दशलक्ष बॅरल व्हेनेझुएलाच्या तेलाच्या विक्रीवर नियंत्रण ठेवत आहे आणि जागतिक बाजारातील या विक्रीचे नियमन अनिश्चित काळासाठी अमेरिकेच्या हातात राहील. यामुळे आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या बाजारात चढउतार वाढल्याचे चित्र दिसून आले आहे. दरम्यान, ट्रम्प यांनी तेल कंपन्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की त्यांना व्हेनेझुएलाशी थेट व्यवहार करण्याची गरज नाही. "तुम्ही आमच्याशी व्यवहार करत आहात, व्हेनेझुएलाशी नाही," असे सांगत त्यांनी कंपन्यांना 'पूर्ण सुरक्षितते'चे आश्वासन दिले. मात्र याचवेळी, व्हेनेझुएलातील दीर्घकाळ चालू असलेली राजकीय अस्थिरता, मालमत्ता जप्तीचा इतिहास, अमेरिकन निर्बंध आणि कायदेशीर अनिश्चितता यामुळे उद्योगजगतामध्ये स्पष्ट सावधगिरी दिसून येत आहे. व्हाईट हाऊसच्या बैठकीत शेवरॉन, एक्सॉनमोबिल, कोनोकोफिलिप्स यांसारख्या प्रमुख अमेरिकन तेल कंपन्यांचे अधिकारी उपस्थित होते. यापैकी काही कंपन्यांचे प्रकल्प २००७ मध्ये तत्कालीन राष्ट्राध्यक्ष ह्यूगो चावेझ यांच्या काळात राष्ट्रीयीकरणामुळे तोट्यात गेले होते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर पुन्हा गुंतवणूक करण्यापूर्वी ठोस कायदेशीर हमी आणि स्थिर धोरणात्मक चौकट आवश्यक असल्याचे मत अनेक अधिकाऱ्यांनी व्यक्त केले. एका उद्योग प्रमुखाने सध्याच्या परिस्थितीत व्हेनेझुएलाला "गुंतवणूक न करण्यायोग्य" असेच वर्णन केल्याची माहिती समोर आली आहे. तथापि, व्हेनेझुएलामध्ये अद्याप कार्यरत असलेल्या एकमेव प्रमुख अमेरिकन कंपनीने परिस्थिती अनुकूल झाल्यास दोन वर्षांत उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य असल्याचे संकेत दिले आहेत.